

१३० कोटींच्या दर्शन मंडपास शिखर समितीची मंजुरी : आ. समाधान ... PII

# पंढरी संचार


• पंढरपूर • बुधवार, २५ सप्टेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८
pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - १३०




हुशारीला चिकाटीची जोड दिल्यास करिअरमध्ये यश अटळ –प्राचार्य डॉ.बी..... PIII

## दूध अनुदानासाठी ९६५ कोटी २४ लाख रुपये मंजूर

# गाईच्या दुधास प्रति लिटर ७ रुपये अनुदान मिळणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यातील सहकारी व खाजगी दूध डेअरींना दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना काहीच्या दुधासाठी प्रति लिटर सात रुपये अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. यासाठी ९६५ कोटी २४ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. शेतकरी शेतात विविध पिकांची लागवड करतो. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. म्हणून शेतकऱ्यांनी शेतीस जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. यासाठी चांगल्या प्रकारच्या गाई कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश येथून आणण्यात आल्या आहेत. बाजारात दुधाला चांगली मागणी व दर आहे. मात्र डेअरी चालक मनमानी कारभार करून शेतकऱ्यांच्या दुधास कमी दर देत आहेत. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत आहे. म्हणून शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांतून करण्यात आली होती. यामुळे शासनाने डेअरी चलकावर करडी नजर ठेवली असून १ ऑक्टोंबर पासून डेअरी चालकांनी ३.५ व ८.५ एस.एन.एफ. असलेल्या दुधास २८ रुपये प्रति लिटर दर देण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. जो डेअरी चालक हा दर देणार नाही त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात दुधाचे प्रतिलिटर सात रुपये अनुदान जमा करण्यात येणार आहे. एकूण दुधाला ३५ रुपये प्रति लिटर दर मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्री उपस्थित होते. सध्या दूध उत्पादक शेतकरी अडचणीत असल्याने त्याला



मदत करण्यासाठी शासनाने दुधाला प्रति लिटर ७ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या अगोदर ५ रुपये अनुदान देण्यात येत होते. यामध्ये २ रुपयांनी वाढ करून ती ७ रुपये करण्यात आली आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाचे अनुदान देण्यात यावे. यासाठी शासनाने ९६५ कोटी २४ लाख रुपये मंजूर केले आहेत. बाजारात दिवसेंदिवस पशु खाद्याच्या किंमती वाढत आहेत. मात्र डेअरी चालक दुधाचे दर वाढत असल्याने शेतकऱ्यांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. याबाबत शेतकरी संघटनेने डेअरीवर शासनाने करडी नजर ठेवावी अशी मागणी केली होती. याची दखल घेऊन शासनाने आता डेअरीवर करडी नजर ठेवली असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गाईच्या दुधास प्रति लिटर ७ रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

## At a Glance

### सातपुतेंचं पार्सल बीडला परत जाणार?

**ाळशिरस :** लोकसभा निवडणुकीत माढा



लोकसभा मतदारसंघाचे चित्र अचानक बदलेले. भाजपला रामराम ठोकत थेट तुतारी हाती घेतली. धैर्यशील मोहिते पाटील ोकसभेच्या मैदानात उतरले. धैर्यशील ोहितेंनी सर्वाधिक राग कोणावर काढला ासेल तो आमदार सातपुते यांच्यावर. "मोहिते ाटील म्हणाले, मला आज एकाच माणसाला त्तर द्यायचं आहे. दादांच्या सांगण्यावरुन का रात्रीत तुला आमदार केला. आता एका ात्रीत तुझं पार्सल माघारी बीडला पाठवायची ामक आमच्यात आहे. " हे एकच वाक्य यंदा ाळशिरस मतदारसंघाची निवडणूक कशी ोणार, हे सांगण्यासाठी पुरेसे आहे.

### पोलीस ठाण्यांच्या नवीन बांधकामासाठी दहा कोटींचा निधी

**क्कलकोट :** अक्कलकोट तालुक्यासाठी



असलेल्या उत्तर आणि दक्षिण पोलीस ठाण्याच्या इमारतींच्या नवीन बांधकामास दहा कोटी 34 लाख ुपयांच्या निधीस मंजुरी मिळाल्याचे ालुक्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी ांनी सांगितले. अक्कलकोट शहरातील दोन्ही ोलीस ठाण्याच्या इमारती या संस्थाकालीन ाहेत. सर्व शासकीय कार्यालयाच्या मारती या सर्व सुख सोयींनी सुसज्ज आणि ाधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केलेल्या ासाव्यात यासाठी सतत पाठपुरावा करून हा कोटींपेक्षा जास्त निधी मंजूर करून ाणल्याचे कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

### महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना अलर्ट जरी

**ोलापूर :** महाराष्ट्रात पावसाने पुन्हा एकदा ोर धरला आहे. बंगालच्या उपसागरातील ामी दाबामुळे पुढील चार दिवस वादळी ाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात ाला आहे. कोकण, मराठवाडा आणि विदर्भात ुसळधार पावसाचा अंदाज आहे. पालघर, ाणे, पुणे, नागपूरसह अनेक जिल्ह्यांना यलो ाणि ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## पांडुरंग परिवाराचे किंग मेकर उमेश परिचारक यांनी माढा मतदार संघातून उभा राहण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पांडुरंग परिवारातील किंगमेकर



उमेश परिचारक यांनी माढा तर माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी पांडुरंग परिवाराच्या बैठकीत केली आहे. यामुळे आता परिचारक कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे .

कृषी उत्पन्न बाजार समिती येथे दोन दिवसापूर्वी पांडुरंग परिवाराची बैठक घेण्यात आली. या बैठकीस पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी पांडुरंग परिवाराचे किंग मेकर उमेश परिचारक यांचे काम चांगले आहे.

मात्र गेल्या अनेक वर्षापासून ते पडद्यामागून राजकारण करत आहेत. यामुळे त्यांनी आता प्रत्यक्षात राजकारणात सहभाग घेऊन जनतेची कामे करावीत यासाठी उमेश परिचारक यांनी माढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी. माढा विधानसभा मतदार संघात पंढरपूर तालुक्यातील ४२ गावांचा समावेश आहे. या गावात १ लाखाहून अधिक मते आहेत. यामुळे याचा फायदा परिचारक यांना होणार आहे. तसेच पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातून माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र परिचारक कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे. पांडुरंग परिवाराने विधानसभा निवडणुकीत सहभाग घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी गेल्या तीन महिन्यापासून पांडुरंग परिवाराच्या बैठका होत आहेत. या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिचारक यांना हातात तुतारी घेऊन निवडणूक लढवावी अशी मागणी केली आहे. यामुळे पांडुरंग परिवारातील काही नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांची भेट घेऊन परिचारक यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी केली आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक लढविण्यास अनेकजण इच्छुक आहेत. निवडणूक तिरंगी चौरंगी झाली तर याचा फायदा परिचारक यांना होणार आहे. यामुळे परिचारक यांनी पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची निवडणूक लढवावी अशी आग्रही मागणी होत आहे.



## अक्कलकोटमध्ये घरफोडी ; दीड लाखांचा ऐवज लंपास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट मधील खासबाग गल्लीतील श्री नवशा गणपती मंदिराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या सेवानिवृत्त लिपिकाचे बंद घर फोडून सुमारे एक लाख 60 हजारांचा ऐवज शनिवारी दुपारी दिवसाढवळा लंपास केल्याने खळबळ उडाली आहे. याबाबतची फिर्याद श्री शहाजी प्रशालेच्या सेवानिवृत्त लिपिक ताराबाई उर्फ विजयालक्ष्मी भीमराव हांडे यांनी दिली आहे. हांडे यांच्या बंद घराचे दार तोडून चाळीस हजार रुपयांची एक तोळ्याची व 20 हजार रुपयांची अर्धा तोळ्याची सोन्याची अंगठी. तसेच एक लाख रुपये रोख असा एकूण 1 लाख 7 हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

## मंदिर समितीच्या लेखा अधिकारी पदी मुकेश अनेचा यांची नियुक्ती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या लेखा अधिकारी पदी शासनाने प्रतिनियुक्तीवर मुकेश अनेचा यांची नियुक्ती केली असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

दि.23 सप्टेंबर रोजी लेखा अधिकारी पदाचा पदभार श्री. अनेचा यांनी स्विकारला आहे. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते श्री. अनेचा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, विनोद पाटील, ज्ञानेश्वर कुलकर्णी, पांडुरंग बुरांडे, राजेंद्र सुभेदार, अतुल बक्षी, दादा नलवडे व इतर कर्मचारी उपस्थित होते. अनेचा हे यापूर्वी जलजीवन मिशन गोंदिया येथे कार्यरत होते.

मंदिर समितीच्या आस्थापनेवर उपजिल्हाधिकारी संवर्गातून कार्यकारी अधिकारी, नायब तहसिलदार संवर्गातून व्यवस्थापक तसेच वित्त व लेखा सेवा मार्फत लेखा अधिकारी ही शासन प्रतिनियुक्तीवरील पदे आहेत. शासनाने सन 2015 मध्ये मंदिर समितीच्या आस्थापनेवर लेखा अधिकारी या पदाची निर्मिती केली असून, आतापर्यंत रविंद्र वाळुजकर, सुरेश कदम, अनिल पाटील यांनी काम पाहिले आहे. मंदिर समितीतील लेखा अधिकारी पद मागील एक वर्षापासून रिक्त होते. सदरचे पद तातडीने भरणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. लेखा अधिकारी पद उपलब्ध झाल्याने ई निविदा पध्दती, दैनंदिन जमा खर्च व इतर अनुषंगीक कामांमध्ये सुसुत्रता आलेली आहे. सदर पद मंदिर समिती व्यवस्थापनाच्या दृष्टीने फायदेशिर सिध्द झाल्याचे दिसून येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी सांगीतले.

सदरचे पद भरणेकामी मंत्रालय स्तरावर मंदिर समितीचे सदस्य आ. रामचंद्र कदम, शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री व आस्थापना विभाग प्रमुख विनोद पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

### सोलापूरचे सलमान व ऊजेर दोन जिल्ह्यातून तडीपार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ोलापूर :** सोलापूर पोलीस



आयुक्तालयानं ऊजेर परवेश दफेदार आणि सलमान पटेल या दोघांना सोलापूर व धाराशीव जेल्ह्यातून ०२ वर्षाकरीता तडीपार केलंय. तडीपारी आदेशानंतर या दोघांना शेजारच्या कर्नाटक राज्यात सोडण्यात आलंय. ऊजेर दफेदार वय-२६ वर्षे, रा. ५५, शोभादेवी नगर, मजरेवाडी, सोलापूर) व सलमान ुड्डूभाई पटेल (वय-२८ वर्षे, रा. ४२, वैष्णु नगर भाग-०२, मजरेवाडी, सोलापूर) याचेविरुध्द साथीदारासह ातक शस्त्र जवळ बाळगून ागरीकांना मारहाण करुन दुखापत करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याचं ांगण्यात आलंय.

## सोलापूर येथे होणाऱ्या मोर्चात माळशिरस तालुक्यातील १४०० शिक्षक सहभागी होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** शाळेतील मुलांना शिकवण्यापेक्षा इतर ऑनलाइन चे कामाचा व्याप त्यामुळे गावातील शिक्षक अडकून बसलेत व वाड्यावर राहणाऱ्या गोरगरीब मुलांचे शिक्षण वाचवण्यासाठी" विद्यार्थ्यांना शिकू द्या आम्हाला शिकवू द्या" ही घोषणा देत सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने दिनांक 25 सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे या मोर्चामध्ये माळशिरस तालुक्यातील चौदाशे जिल्हा परिषद शिक्षक सहभागी होणार असल्याची माहिती सोलापूर जिल्हा शिक्षक समितीचे जिल्हा सरचिटणीस शरद रुपनवर सर यांनी दिली आहे .या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसापूर्वी सर्व प्राथमिक शिक्षक संघटनेची बैठक झाले होते. महाराष्ट्राचे शिक्षणक्षेत्र वाचवण्यासाठी एकवटलेल्या सर्व संघटनाने साखळी आंदोलनाचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित केला आहे. त्यामध्ये माळशिरस तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शिक्षकाने सहभाग नोंदवला आहे यामध्ये जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी काळे फीत लावून शासन निर्णयाचा निषेध केला आहे .25 सप्टेंबर रोजी होणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालयावर होणाऱ्या मोर्चा सामूहिक किरकोळ रजा घेऊन शिक्षक तसेच पालक ही सहभागी होणार असल्याचे सांगितले आहे. सतत बदलणारे शासनाच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना आम्हाला शिकवू द्या म्हणण्याची वेळ शिक्षकावर आली आहे. शिक्षकांना शिकवण्यापेक्षा शिक्षकांचा बराच वेळ बाकीच्या ऑनलाईन कामात अडकून जात आहे त्यामुळे शिक्षकांना मुलांना शिकवायला वेळ मिळत नाही याचमुळे काही पालकांनी सुद्धा या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. हा एकमेव मोर्चा आहे ज्यात सर्व संघटना एक वाटल्या आहेत

### अजितदादांकडून बबनदादांचे कौतुक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** माढा विधानसभा मतदारसंघाचे



आमदार बबनदादा शिंदे यांच्यात काम करण्याची धमक आहे. त्यामुळे ते कामाचे लोकप्रतिनिधी आहेत. विकासकामांना मार्गी लावण्यास ते समर्थ आहेत. त्याकरिता लागणारा निधी पुरवण्यात आम्ही कुठे कमी पडलो नाही आणि पुढेही पडणार नाही. राज्य सरकारच्या वतीने ज्या शासकीय योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत, त्या यापुढे देखील सुरूच रहाव्यात यासाठी तुमचे पाठबळ हवे आहे. आगामी निवडणुकांत आम्हाला साथ द्या, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. टेंभुर्णी येथे जन सन्मान यात्रेवेळी ते बोलत होते.

### सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या लेखा अधिकारी पदी शासनाने प्रतिनियुक्तीवर मुकेश अनेचा यांची नियुक्ती केली. दि.23 सप्टेंबर रोजी लेखा अधिकारी पदाचा पदभार श्री. अनेचा यांनी स्विकारला आहे. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते श्री. अनेचा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, विनोद पाटील, ज्ञानेश्वर कुलकर्णी, पांडुरंग बुरांडे, राजेंद्र सुभेदार, अतुल बक्षी, दादा नलवडे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## यंदाच्या गाळभंगामात १२३५ लाख टन उसाचे गाळप होणार

# १५ नोव्हेंबर पासून महाराष्ट्र व कर्नाटकात गाळप हंगाम सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** यंदा राज्यात चांगला पाऊस पडला आहे. यामुळे ऊसाचे उत्पादन चांगले आले आहे. यंदा राज्यात १२३५ लाख टन ऊसाचे गाळप होणार आहे. यासाठी १५ नोव्हेंबर पासून राज्यातील व कर्नाटकमधील साखर कारखाने सुरू होणार आहेत. सन २०२४-२५ चा साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत राज्यात विधानसभेचे वारे वाहू लागले आहे. यामुळे निवडणुकीत विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झालेले असताना यामुळे साखर गाळप हंगामावर कोणताही परिणाम होऊ नये यासाठी निवडणुका झाल्यानंतर म्हणजे १५



नोव्हेंबर पासून राज्यातील साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच दिवसापासून कर्नाटकमध्येही साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू होणार आहे.

यंदाच्या वर्षी १२३५ लाख टन ऊसाचे गाळप करण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या वर्षी केंद्र सरकारने साखर कारखान्यांना उपपदार्थ निर्मिती करण्यास बंदी घातली होती. मात्र यंदाच्या गाळप हंगामात ती उठविण्यात आली असून साखर कारखाने उपपदार्थ तयार करू शकतात. यामुळे साखर कारखान्याच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. एकंदरीत शासनाने यंदाच्या वर्षी साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू करण्यासाठी सर्व तयारी केली आहे. सध्या राज्यात परतीचा पाऊस असल्याने शेतात पाणी साचले आहे. यामुळे पिकांची तोडणी करणे शक्य होणार नाही. म्हणून यंदाच्या वर्षी गाळप हंगाम पाऊस व विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून पंधरा दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. गेल्यावर्षी १ नोव्हेंबर रोजी गाळप हंगाम सुरू झाला होता. मात्र यंदाच्या वेळेस तो १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### मराठा समाजाकडून २६ सप्टेंबरला सोलापूर बंदची हाक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सकल मराठा समाजाचे



समन्वयक माऊली पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन २६ सप्टेंबर रोजी सोलापूर शहर व जिल्हा बंदची हाक दिली आहे. पवार यांनी दिलेल्या प्रेस नोट मध्ये सकल मराठा समाज सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने दि. २६ सप्टेंबर गुरुवार रोजी सकल मराठा समाजाचा ओबीसी मध्ये समावेश करावा. परंतु शासनाने त्यांची दखल घेतली नाही तसेच शासनाकडून विशेषतः सत्ताधारी पक्षाकडून मराठा व ओ. बी. सी. यांच्यात भांडणे लावून जातीय दंगली घडवण्याचे कारस्थान सत्ताधारी करत आहेत.

## निवडणुकांची मतमोजणी माढा शहरातच झाली पाहिजे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून स्वातंत्र्योत्तर काळापासून माढा शहरात चालत आलेली सर्वच निवडणुकांची मतमोजणी ही मतदार संघाच्या बाहेरील गावात होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, या प्रश्नावर सत्ताधारी आमदारांची काहीच ठोस भूमिका पाहायला मिळत नाही. आमदारांच्या पोकळ आश्वासनातून काहीही साध्य होणार नाही. निवडणुकांची मतमोजणी माढा शहरातच झाली पाहिजे अशी आग्रही मागणी माढा नगरपंचायतच्या



नगराध्यक्षा मीनल साठे यांनी केली. आज रास्ता रोको आंदोलन करून आम्ही याचा जाहीर निषेध करीत आहोत, असेही त्या म्हणाल्या.

**सोलापूर** : चिंचोळी एमआयडीसी येथील स्वतःच्या पीयूसी पाईप तयार करण्याच्या कारखान्यात काम करीत असताना, विजेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू झाला. मयुरेश मोहनराव पाटील (वय २९ रा. उत्कर्ष नगर, विजापूर रोड सोलापूर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. मयुरेश पाटील हे नेहमीप्रमाणे सकाळी चिंचोळी एमआयडीसी येथील त्रिगुण प्लास्टिक इंडस्ट्रिज या कारखान्यात आले. ते स्वतः काम करीत असताना त्यांना अचानक वायरच्या विजेचा शॉक लागला.

## तिरुपतीच्या धर्तीवर टोकन दर्शन सोय होणार : ६ हजार भाविकांसाठी वातानुकूलित दर्शन मंडप

# १३० कोटींच्या दर्शन मंडपास शिखर समितीची मंजुरी : आ. समाधान आवताडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर** : येथील श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी १३० कोटी रुपयांच्या दर्शन मंडप आणि स्काय वॉक आराखड्यास तीर्थक्षेत विकास आराखडा शिखर समितीने मंजुरी दिली आहे, लवकरच या आराखड्यास राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळेल. हा दर्शन मंडप उभा राहिल्यानंतर टोकन दर्शन सुविधा सुरु करण्यात येईल. ६ हजार भाविकांची सोय होणार आहे, अशी माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना आ.आवताडे म्हणाले कि, तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची मंगळवारी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थतीतीत बैठक संपन्न झाली. या बैठकीस पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आ. शिवेंद्रराजे भोसले, आ. समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेल्या दर्शन मंडप आणि स्काय वॉक आराखड्यास शिखर समितीने मंजुरी दिली. भाविकांची वाढती संख्या आणि दर्शन रांगेत सुविधा पुरवताना प्रशासनावर येणारा ताण लक्षात घेता या आराखड्यास तात्काळ मंजुरी द्यावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानुसार या शिखर समितीची बैठक झाली आणि १३० कोटींच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळाली. यानंतर लवकरच राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या आराखड्यास मंजुरी मिळेल आणि लवकरात लवकर पुढील कारवाई सुरु होईल. या दर्शन मंडप आराखड्यात १६ हजार चौरस मीटरचा २ मजली दर्शन मंडप, आणि दर्शन मंडप ते विठ्ठल मंदिर पूर्व प्रवेशद्वार असा १०५० मीटर्स लांबीचा स्काय वॉक, दर्शन मंडप वातानुकूलित, दर्शन मंडपास ६ लिफ्ट आणि २ रॅम्प, cctv, ३० पास स्कॅनींग काउंटर, हिरकणी कक्ष, उपहार गृह, वैद्यकीय सेवा,स्त्री, पुरुष आणि दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रथमोपचार सुविधा, अग्निशमन यंत्रणा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणार आहे, भाविकांची गरज लक्षात घेता भविष्यात दर्शन मंडपाची क्षमता वाढवण्यात येणार आहे. सहा हजार भाविकांची क्षमता असली तरी आताच त्यात वाढ करून १० हजार भाविकांची क्षमता वाढवावी अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे. या दर्शन मंडपाची देखभाल पंढरपूर नगरपालिका करणार आहे, असेही आ. आवताडे यांनी सांगितले.

## वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील तरुण ठार




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला** : अज्ञात चारचाकी वाहनाची दुचाकीला जोराची धडक बसून अपघातात ३४ वर्षीय तरुण जागीच ठार झाला. हा अपघात रविवारी रात्री ९ च्या सुमारास सांगोला ते कडलास रोडवरील गायकवाड वस्तीजवळ घडला. सचिन पांडुरंग आमले (वय ३४, रा. जवळा, ता. सांगोला) असे मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंभू राज साळुंखे यांनी खबर दिली आहे. तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल धनंजय औताडे करीत आहेत. सचिन आमचे यांच्या अपघात प्रकरणी गावातील ग्रामस्थांमधून उलट सुलट चर्चा सुरु असल्याचे दिसून येत आहे.

Selected

## सोनाली गुजरे यांचे दुःखद निधन



**माळशिरस** : माळशिरस येथील सोनाली गुजरे (वय 30) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले त्यांच्या पाश्चात पती दोन मुली सासू-सासरे व दिर असा परिवार आहे .श्रीनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य योगेश गुजरे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या निधनाने माळशिरस शहर व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.


## पालखी मार्गानंतर आता मिशन 'स्वच्छ पंढरपूर'



**पंढरपूर** : दरवर्षी हरीनामाचा गजर करीत श्री विठ्ठलाच्या भेटीस पंढरपूरला जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांचा पालखी मार्ग तब्बल ११ हजार कोटींची योजना अंमलात आणत प्रशस्त केल्यानंतर आता 'स्वच्छ पंढरपूर' मिशन हाती घेण्यात येत असल्याचे स्पष्ट संकेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. आषाढी आणि कार्तिकी वारीला वारकऱ्यांना अनेकदा अपघात होत. वारी सुरक्षित करण्याचे आव्हान स्वीकारून फडणवीस यांनी महामार्ग प्रकल्पांची कल्पना पुढे आणली आणि केंद्र सरकारने मंजुरी दिली. याबाबत लवकरच निर्णय घेऊन कामास सुरुवात होणार आहे. त्यामुळे 'स्वच्छ पंढरपूर' मिशन हाती घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## तिरवंडी ते बंडगरमळा- मेडद- उंबरे दहिगाव रस्ता दुरुस्तीसाठी शामराव बंडगर यांचे निवेदन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस** : तिरवंडी तालुका माळशिरस येथील यशवंतनगर ते तामशिवाडी रस्ता क्र 177 मधील तिरवंडी ते बंडगरमळा मेडद उंबरे दहिगाव रस्त्याला मोठमोठे खड्डे पडले आहेत शालेय विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिक व दवाखान्यासाठी येजा करण्यासाठी ग्रामस्थांना अतिशय नाहक त्रास सहन करावा लागत आहे रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असल्याने व रस्ता खराब झालेला असल्याने ग्रामस्थांना येजा करण्यासाठी व वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे तरी सदर रस्त्याची दुरुस्ती दिनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी पर्यंत करावी अन्यथा दिनांक 1 ऑक्टोंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजल्यापासुन रस्त्यावर तिरवंडी बंडगरमळा येथील धुळदेव मंदिरा शेजारी रस्त्यावरती तिरवंडी येथील ग्रामस्थयांच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन तिरवंडी ग्रामपंचायत सदस्य शामराव बंडगर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अकलूज यांना दिले आहे.

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील भैय्या मोहिते-पाटील व जनतेचे आमदार लोकनेते उत्तमराव जानकर साहेब यांनी या प्रकरणाकडे लक्ष द्यावं अशी तिरवंडी ग्रामस्थांची मागणी आहे. सदर निवेदनाच्या माहितीसाठी प्रती तहसीलदार माळशिरस व माळशिरस पोलीस स्टेशन यांना दिल्या आहेत.

## स्वागत...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मोहोळ** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, कथा महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार हे मोहोळ येथे भव्य जन् सन्मान यात्रेच्यावेळी आले असता दादांचे महिला भगिनींनी मोठ्या उत्साहात स्वागत करुन भगिनींनी दादांना राख्या बांधल्या.

## वडिलांनी केलेल्या कष्टाचे फळ मिळाले - हिवरकर पाटील



**माळशिरस** : अत्यंत हलाखीची परिस्थिती असून सुद्धा माझ्या मुलाला मी पोलीस बनवणारच ह्या स्वप्नाला उराशी बाळगून मूळचे सदाशिवनगर येथील पिंटू ओवाळ सध्या राहणार पिंपरी चिंचवड आणि पिंपरी चिंचवड येथील भाजी मंडई मध्ये हमाली करणाऱ्या एका बापाचे स्वप्न पूर्ण करण्यात त्यांचा अनिकेत नावाचा मुलगा अवघ्या 20 व्या वर्षी सोलापूर एस आर पी एफ मध्ये पोलीस पदावर विराजमान झाला. अनिकेत ओवाळ हे सध्या पदवीच्या दुसऱ्या वर्षामध्ये शिकत आहेत बारावी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी खूप कष्टाने आणि जिद्दीने अभ्यास करून पोलीस व्हायचं आणि वडिलांचे स्वप्न आहे की मुलाला वर्दी ही मिळालीच पाहिजे हे स्वप्न उराशी बाळगून रात्रंदिवस अभ्यास करून अवघ्या दोनच वर्षात सोलापूर येथे झालेल्या एस आर पी एफ या पदासाठी गवसणी घातली आहे. त्यांचं अभिनंदन करताना राजकुमार हिवरकर पाटील शिवसेना नेते तथा विश्वस्त नातेपुते एज्युकेशन सोसायटी म्हणाले की खूप कमी वयात मोठी जबाबदारी तुमच्यासारख्या वीर जवानांच्या हाती आली म्हणजे आपला भारत देश पूर्ण तरुणांच्या हाती आला तसेच बोलताना पुढे म्हणाले की वडिलांनी जी हालाखीची परिस्थिती बघितली ती माझ्या मुलाच्या नशिबात येऊ नये म्हणून त्यांनी अनिकेतला चांगले शिक्षण त्याचबरोबर संस्कार ही चांगले दिले. मूळचे सदाशिवनगर येथील रहिवासी असलेले ओवाळ कुटुंबीय आहे पिंपरी चिंचवड येथे वास्तव्यास गेले तिथे जाऊन त्यांनी मोलमजुरी करत पिंपरी चिंचवड भाजी मंडई येथे हमाली करत आहेत. हमाली करत असताना त्यांना रोज नवीन नवीन पोलीस आणि वर्दी याचं आकर्षण वाटू लागलं व माझ्या मुलाला मी पोलीसच बनवणार असं स्वप्न त्यांनी बाळगलं त्यातच बारावी झाल्यानंतर अनिकेत ने चांगला अभ्यास करून पोलीस पदी विराजमान झाला असे गौरवोद्गार काढले त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित भाजपाचे मनोज जाधव तेजस गोरे,विनोद बोराटे, रोहित ओवाळ, सोमनाथ भोसले, आदित्य सावंत, अनिकेत मिसाळ होते

## व्यापाऱ्याची २१ लाख रुपयांची फसवणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**बार्शी** : बार्शीतील एका व्यापाऱ्याला जालना येथील दोन व्यापाऱ्यांनी तब्बल २१ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. खरेदी केलेल्या मालाच्या बदल्यात उर्वरित रक्कम न दिल्यामुळे हे प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले असून, दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन भारत शेटे (वय ४७, रा. दत्तनगर, बार्शी) यांचे बार्शीच्या आडत बाजारात दुकान आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जालना येथील अशोका ट्रेडिंग कंपनीचे मालक अतिन अशोक पांगारकर आणि संतोष अण्णा नवपुते यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## उमेद अभियान पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात; मागण्या मान्य न झाल्याने आंदोलनाचा इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर राबविण्यात येते. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सक्रियतेने काम सुरू आहे. अभियानाच्या माध्यमातून तब्बल ३००० अधिकारी व कर्मचारी मागील दहा वर्षापासून कंत्राटी स्वरूपाने काम करीत आहेत. सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागील तीन वर्षापासूनच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी शासन दरबारी वेळोवेळी मागणी करण्यात आली होती. परंतु मागणी मान्य न केल्यामुळे दि.१० ते १२ जुलै २०२४ दरम्यान आझाद मैदान मुंबई येथे अधिवेशन कालावधीत आंदोलन करण्यात आले. झालेल्या आंदोलनामध्ये मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांनी मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र तब्बल अडीच महिना होऊनही मागण्या मान्य न झाल्यामुळे उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सर्व महिला , कार्यरत केडर, कंत्राटी अधिकारी व कर्मचा-यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०२४ पासून गाव स्तरापासून ते राज्य स्तरावर पुन्हा आंदोलन सुरू करत असल्याचा इशारा दिला आहे.त्यासाठी सर्व पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांना निवेदने दिली आहेत. महाराष्ट्र शासनाकडून राबवण्यात येणारे उमेद अभियान हे महिला स्वयं सहायता समूह (बचत गट) स्थापन करण्यापासून महिलांना व्यवसायात उभे करण्यापर्यंत गावोगावी काम करत आहे. महिलांच्या विविध स्तरावर संस्था स्थापन करून त्या संस्था बळकट करताना महिलांची आर्थिक उन्नती साधून दारिद्र्य निर्मूलनाचे काम मोठ्या प्रमाणत करीत आहे. सद्यस्थितीमध्ये राज्यात सुमारे ८४ लाख कुटुंब या अभियानामध्ये समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ९० टक्के महिलांचा सहभाग अभियानामध्ये झालेला आहे त्यामुळे अभियानाच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये विकसित भारत करण्याची संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी उमेद अभियान हा स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग होणे आवश्यक आहे. यामुळे अभियानाच्या माध्यमातून सुरू असलेले काम हे शाश्वत आणि चिरकाल सुरु राहील. त्यामुळे उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाला स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेण्याची मागणी उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. या प्रमुख मागणीच्या अनुषंगाने संघटनेच्या वतीने गाव स्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत टप्प्याटप्प्याने कृती कार्यक्रमाची आखणी करण्यात आलेली आहे. या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून मागण्या मान्य करण्यासंदर्भात लोकशाही पद्धतीने गाव,प्रभाग,तालुका ,जिल्हा व राज्य स्तरावरआंदोलने,प्रभात फेरी, मागणीबाबत जनजागृती मेळावे,उमेद मागणी जागर,दिंडी व महा अधिवेशन भरविण्यात येणार असल्याचे राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

## अनगर अप्पर तहसील रद्द करण्यासाठी समितीच्या वतीने

# हायकोर्टात ८ जणांची आणखी एक जनहित याचिका दाखल

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ** : अनगर अप्पर तहसील रद्द करण्यासाठी समितीच्या वतीने हायकोर्टात ८ जणांनी मिळून आणखी एक जनहित याचिका ही ॲड. धनंजय चव्हाण (मुंबई ) यांच्या मार्फत दाखल केली असल्याची माहिती सोमेश आबा क्षीरसागर यांनी दिली. या जनहित याचिकेला पीआय एल/२६८६६/२०२४ असा नंबर पण पडला आहे. मोहोळ तालुक्याचे विभाजन होऊन अनगर येथे नव्यानेच अपर तहसील कार्यालय मंजूर केल्याचा आदेश राज्य शासनाकडून पारित झालेला आहे.याला विरोध करण्यासाठी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीची स्थापना झाली असून या समितीच्या माध्यमातून मागील अनेक दिवसापासून अनेक वेगवेगळ्या धाटणीची आंदोलने केली आहेत. तर मुख्यमंत्री , दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याही भेटी घेऊन मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या सदस्यांनी आपली कैफियत मांडली .मात्र त्यावर कोणताही तोडगा निघत नसल्याने, समिती ने या पूर्वी ही न्यायालयीन लढा लढण्यासाठी ॲड. अनंत वडगावकर बार असोसिएशन मोहोळ यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केली आहे .

आता ही दुसरी जनहित याचिका सोमेश क्षीरसागर (नरखेड मोहोळ), उमेश पाटील (नरखेड) विजयराज डोंगरे (शेटफळ) मानाजी माने (पेनूर), नरखेडचे सरपंच यशवंत मोटे, बालाजी खुर्द (येवती), विक्रांत दळवी( पोखरापूर) मनोज मुळे(सारोळे) या आठ जणांनी दाखल केली आहे यामुळे यावर निर्णय काय होणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. याच्या आधी संतोष पाटील नरखेडकर यांनीही एक जनहित याचिका दाखल केले आहे ती मंगळवारी दि. २४ सप्टेंबर रोजी मुख्य न्यायाधीशांच्या मा .देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या समोर सुनावणीस येईल असेही सोमेश आबा यांनी सांगितले. या दोन्हीही याचिकांच्या साठी सीनियर कौन्सिल ॲड . अनिल अंतुरकर, ॲड.वृषाली मैदाड (मुंबई) अँड. धनंजय चव्हाण (माढा) हे काम पाहणार आहेत असेही सोमेश आबा यांनी सांगितले. अनगर येथे नव्याने मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यासाठी मोहोळ तालुक्यातून मोठी जनचळवळ उभी राहिली आहे. अनेक आंदोलने करून ही प्रशासन व शासनाला जाग येत नसल्याने मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या वतीने न्यायालयीन लढा लढण्याची केली आहे. याबाबत संघर्ष समितीचे सोमेश क्षीरसागर हे माध्यमांशी बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, या अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करताना महाराष्ट्र राज्य महसूल अधिनियम कायद्याची अंमलबजावणी झाली आहे काय ? , हे कार्यालय नव्याने सुरू करत असताना त्याचे प्रसिद्धीकरण व नागरिकांच्या हरकती मागवल्या आहेत काय ?, शासनाने व प्रशासनाने या कार्यालयाची निर्मिती करताना कोणत्या मूलभूत बाबी विचारात घेतल्या आहेत ? अनगर पेक्षा मोहोळ हेच जवळचे , सोयीस्कर व मध्यवर्ती ठिकाण आहे हे दिसून येते. अनगर हे त्यांना आडवळणीचे व गैरसोयीचे होते आहे. तसेच कायदेशीरदृष्ट्या व लोकांच्या सोयीच्या दृष्ट्या शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे.त्याच बरोबर एखाद्या राज्याचा संविधानिक प्रमुखाने एखाद्या निर्णयाला स्थगिती दिली. तर त्या स्थगिती निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महसूल विभागाची असते. ती अद्याप का झालेली नाही. म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या स्थगितीला काहीच अर्थ नाही का ?, मुख्यमंत्री हे राज्याचे संविधानिक प्रमुख असतात. त्यांचा हा अपमानच आहे. या सर्व बाबी दाखल केलेल्या याचिकेत नोंदविल्या आहेत.असे सोमेश क्षीरसागर म्हणाले.



**माढा :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने आले होते. यावेळी ते म्हणाले की, माढा ही संतांची भूमी असून श्री संत शिरोमणी सावता महाराजांनी भक्तीच्या मार्गावर चालण्याचा संदेश संपूर्ण मानव जातीला दिला. संतांच्याच विचारांची शिदोरी सोबत घेऊन आम्ही लोककल्याणकारी योजना राज्यभर राबवत आहोत. गोरगरिबांच्या मुलींना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून शिक्षण आम्ही मोफत केले आहे. बळीराजा खुष तर आपण खुष. म्हणूनच शेतकरी बांधवांना वीज बिल माफी दिली आहे.

## स्वेरीत प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ संपन्न

# हुशारीला चिकाटीची जोड दिल्यास करिअरमध्ये यश अटळ –प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** 'ध्येय साध्य करण्यासाठी ज्या गोष्टी करायला आवडत नाहीत त्या गोष्टी प्रयत्नपूर्वक करणे गरजेचे आहे. यासाठी वेळप्रसंगी मनावर देखील सकारात्मक दादागिरी केली पाहिजे. अभियांत्रिकीमधून करिअर करताना कोणती ब्रँच मिळाली हे महत्वाचे नाही, त्यापेक्षा मिळालेली ब्रँच ही जगातील सर्वोत्तम ब्रँच आहे असे समजून त्या ब्रँचला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला पाहिजे कारण करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी 'हार्ड वर्क' करण्याची गरज आहे. 'हार्ड वर्क'मुळे हुशारी देखील वाढते. हुशारीला चिकाटीची जोड दिल्यास करिअर मध्ये हमखास यश मिळते.' असे प्रतिपादन स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मधील अभियांत्रिकीच्या पदवी, पदविका व एमबीए या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष तसेच थेट द्वितीय वर्ष इंजिनिअरिंगला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजिलेल्या स्वागत समारंभा प्रसंगी स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे हे मार्गदर्शन करत होते. व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणुन प्रताप वाघ व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.वैशाली स्वामी हे उपस्थित होते. दीपप्रज्वलनानंतर प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी प्रास्ताविकात 'ग्रामीण भागात स्वेरीची सुरवात केलेल्या डॉ. बी. पी. रोंगे सरांनी विद्यार्थ्यांसाठी १९९८ पासून तंत्रशिक्षणाचे दालन खुले केले. २६ वर्षांच्या कालावधीत ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी आज मोठ्या पॅकेजसह देशात आणि परदेशात स्थायिक होवून ते उत्तम करिअर करत आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात 'स्वेरी'चा आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक आहे,' असे सांगून आजपर्यंतच्या वाटचालीतील महत्वाच्या टप्प्यांवर लक्ष वेधले. पुढे बोलताना संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.रोंगे म्हणाले की, 'आपल्याला मातृभाषेचा अभिमान असलाच पाहिजे पण करिअरची इमारत पक्की बांधायची असेल तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्कोप असलेल्या इंग्रजी भाषेमधून संभाषण करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये बदल करणे आणि करिअरच्या दृष्टीने त्यांची सर्वोत्तम तयारी करून घेणे हाच स्वेरीचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी आमचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सज्ज आहेत. स्वेरीमधून नापास होणे ही बाब अत्यंत अवघड आहे तर गुणवत्ता यादीत येणे, फर्स्ट क्लासमध्ये पास होणे या बाबी मात्र स्वेरीत खूप सोप्या आहेत म्हणून पालक व विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या माध्यमातून स्वेरीवर टाकलेला विश्वास मुळीच वाया जाणार नाही.' असे सांगून विद्यार्थ्यांनी टीव्ही, मोबाईल, तथाकथित मित्र व आपल्या स्वतःचा नकारात्मक दृष्टीकोन या चार गोष्टींपासून दूर राहण्याचा कानमंत्रही प्राचार्य डॉ. रोंगे यांनी दिला. याप्रसंगी गोपाळपूरचे माजी उपसरपंच विक्रम आसबे, संभाजी शिंदे, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त एच.एम. बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. करण पाटील, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विविध भागांतून आलेले त्यांचे पालक असे मिळून सुमारे चार हजारांहून अधिक विद्यार्थी व पालक या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

## गोदुताई वसाहतीसाठी शंभर कोटींचा निधी आणणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** गोदूताई परूळेकर बसाहतीमधील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता राज्य शासनाकडे पाठपुरावा करून मुख्य अंतर्गत रस्ते (अंदाजे १६ कि. मी. ) बांधणीकरिता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून विशेष बाब माणून मान्यता देऊन ९. ७५ कोटी रुपये निधी मलनिःसारण व्यवस्थाकरिता ७० कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. राज्य सरकारकडून वसाहतीच्या सर्वांगीण विकासासाठी किमान १०० कोटी रुपयांचा निधी आणण्याची भीष्मप्रतिज्ञा कामगार नेते नरसय्या आडम यांनी केली.

## Selected

## संयुक्त पूर्व परीक्षा 2024 ची नवी तारीख जाहीर

**सोलापूर :** महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा 2024 जी पूर्वी पुढे ढकलली होती, आता 1 डिसेंबर 2024 रोजी आयोजित केली जाणार आहे. कृषी सेवेच्या 258 पदांचा समावेश या परीक्षेत करण्यात येईल. एमपीएससीने 25 ऑगस्टला होणारी परीक्षा आयबीपीएसच्या परीक्षेशी एकाच दिवशी असल्याने पुढे ढकलली होती. पुण्यात झालेल्या आंदोलनानंतर राज्य शासनाने परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती केली होती. उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी 21 दिवसांचा कालावधी दिला जाणार आहे. अधिक माहितीसाठी [mpsc.gov.in](mpsc.gov.in) या संकेतस्थळावर तपशील उपलब्ध होईल.

## धनगर आरक्षणासाठी रस्ता रोको आंदोलन



**करमाळा :** करमाळा येथील मौलालीमाळ चौक येथे रास्ता रोको आंदोलन केले. गजा ढोलने सर्वांचे लक्ष वेधले. प्रशासनाच्या वतीने पोलिस निरीक्षक विनोद घुगे व मंडळ अधिकारी राजेंद्र राऊत यांनी निवेदन स्वीकारले. राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी धनगर समाजाचे बांधव पंढरपूर व लातूर येथे उपोषण करत आहेत. परंतु सरकारने त्यांची विचारपूसही केली नाही. उपोषणकर्ते यांची प्रकृती गंभीर होत आहे. या घटनेचा निषेध म्हणून धनगर बांधवांनी रस्ता रोको आंदोलन केले.

## उदयसिंह मोहिते पाटील यांना अभिवादन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अकलूज :** उद्योग महर्षि कै. उदयसिंह शंकरराव मोहिते पाटील तथा बापूसाहेब यांच्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र आनंदी गणेश आनंदनगर, अकलूज येथील शक्तीस्थळ समाधीस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, मोहिते पाटील परिवार व उपस्थित मान्यवरांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री क्षेत्र आनंदी गणेश सेवाभावी संस्था, आनंदनगर-अकलूज यांच्यावतीने आनंदनगर परिसरातील गरजू विद्यार्थिनींना सायकलिंचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शिवकिर्ती बाग आनंदनगर परिसर येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## विकास कामांचा शुभारंभ...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**करमाळा :** राज्य शासनाने करमाळा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी भरघोस निधी मंजूर केलेला आहे. यामध्ये सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अंतर्गत 282. 75 कोटी निधी असलेली विविध कामे, 34 कोटी 68 लाख निधी मंजूर असलेल्या करमाळा शहरातील नवीन प्रशासकीय इमारत तर करमाळा तालुक्यात हॅम अंतर्गत 271 कोटीच्या रस्ते कामांचा समावेश आहे. यावेळी एकात्मिक पर्यटन विकास आराखडा व प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन तर रस्ते कामांचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज करण्यात आला.

## आरोग्य मित्रांची संख्या वाढवा; मागणी



**सोलापूर :** सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयुष्यमान भारत मिशन अंतर्गतच्या योजनांच्या कामकाजाची आढावा बैठक आयुष्यमान भारत मिशन समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी डॉ. शेटे म्हणाले, जन आरोग्य योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी आरोग्य मित्रांची संख्या वाढविण्यात यावी व आपले 12 अंकी रेशन कार्ड अद्यावत करून घ्यावे. जिल्हा पुरवठा विभागाने रेशन कार्ड अद्यावत करण्यासाठी मदत करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## अनोळखी महिलेचे प्रेत आढळले



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी तालुक्यातील अलीपुर हद्दीत एका शेतालगत रेल्वे ट्रॅक जवळ 31 ते 35 वर्षाच्या स्त्री जातीचे प्रेत आढळून आले आहे. ही घटना रविवार 22 सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत पोलीस पाटील विकास दगडू लांडगे( राहणार अलीपूर, तालुका बार्शी ) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेंद्र मंगरूळ यांनी फोन द्वारे कळवल्यानंतर जाऊन पाहणी केली असता एक अनोळखी स्त्री जातीचे प्रेत आढळून आले.

### शालेय तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत

## पानीवच्या श्रीराम इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनीचे यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** दिनांक 23 सप्टेंबर, 2024 रोजी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय अकलूज येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत लांब उडी या वैयक्तिक क्रीडा प्रकारात 14 वर्षे वयोगट मुलींमध्ये श्रीराम इंग्लिश स्कूल पानीव ची इयत्ता आठवी तील विद्यार्थिनी कु.खुशी सतीश घुले या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

या तिच्या यशाबद्दल श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश पाटील, उपाध्यक्ष मा.श्री. करण पाटील, मार्गदर्शक मा. सौ. श्रीलेखा पाटील, सचिव मा.श्री. ॲड. अभिषेक पाटील, विशेष कार्यकरी अधिकारी मा.श्री दिनेश शिंदे, भाऊसो वणवे, विनोद बाबर प्रमोद झगडे, प्राचार्य मा. सौ रेणुका जावळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. त्यांना क्रीडाशिक्षक सुखदेव घुले अशोक देशमुख सर यांचे मार्गदर्शन लाभले. खुशी सतिश घुले हिच्या या यशाबद्दल सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.

## सोनके येथे विधी साक्षरता शिबीराचे आयोजन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर अधिवक्ता संघ पंढरपूर व तालुका विधी सेवा समिती पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबिर दिनांक 24/ 9/ 2024 रोजी सकाळी 10 वाजता ग्रामपंचायत सोनके तालुका पंढरपूर येथे पार पडले या शिबिरामध्ये "दिवाणी वाद त्याबद्दलचे कायदे तसेच फौजदारी गुन्हे यामध्ये आरोपी ला बेल चा अधिकार" याबद्दल सखोल असे कायदेशीर मार्गदर्शन करण्यात आले यामध्ये अध्यक्ष राजेश चौगुले यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली सचिव अभयसिंह देशमुख यांनी 'Senior citizen त्यांचे अधिकार" बद्दल सखोल असे मार्गदर्शन केले, सदस्य गणेश चव्हाण यांनी कायदेशीर साक्षरता व त्याची गरज याबद्दल माहिती सांगितली तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री बुद्रुक साहेब यांनी भारताची राज्यघटना यामधील अधिकार व त्यांचे कर्तव्य तसेच कोणत्याही प्रकारचा अन्याय झाला तरी त्याला वाचा फोडून अन्याय दूर करण्यासाठी कोठे दाद मागायची त्याबाबत कायद्यातील तरतुदी याबद्दल सखोल मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपाध्यक्ष महेश कसबे यांनी केले. या कार्यक्रमाला वकील संघाचे सदस्य हनुमंत दुधाळ ,अप्पासाहेब कोळेकर, राजकुमार गायकवाड, काकासो केंगार आदी उपस्थित होते. यावेळी सोनके गावचे सरपंच चंदनशिवे,भारतनाना कोळेकर,मा.पंचायत समिती सभापती अरुण घोलप,लिंगाप्पा कोळेकर,दादा खरात, यांनी परीश्रम घेतले.

**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर, जिल्हा सोलापूर**

**जाहीर सूचना**

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रं. २१५/२००५ मधील संकीर्ण आवेदन क्र. १६९९/२०१९ च्या संदर्भात दिलेल्या निकालामधील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने दाखल जनहित याचिका क्र. ०३/२०२४ (Right to Die with diginity) मधील सूचनांनुसार पंढरपूर नगरपरिषद कार्यालयाव्दारे नियुक्ती करण्यात आलेल्या Custodian यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

Custodian- श्री. सुनील वाळुजकर, उपमुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर, जि.सोलापूर

कार्यालय दूरध्वनी -०२१८६२२३०१३

सही/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर




## राज्यातील कोतवालांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घेण्याची आ. समाधान आवताडे यांची मागणी

# सदर मागणीचे आ.आवताडे यांनी महसूल मंत्री ना.विखे- पाटील यांना दिले पत्र

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** राज्याच्या महसूल विभागातील कोतवाल कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी निश्चित करून शासकीय सेवेमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात यावे या मागणीसाठी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी राज्याचे महसूल मंत्री मा.ना.राधाकृष्ण जी विखे-पाटील यांची मंत्रालयीन दालनात भेट घेऊन सदर मागणीचे त्यांना पत्र दिले आहे. महाराष्ट्र राज्यातील कोतवाल ही शासकीय कामास बांधील राहून कर्तव्य व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. राज्यातील लोकसंख्या ठिकाणी कोतवाल हे सजा मुख्यालय सोडून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय या ठिकाणी वर्ग ३ व वर्ग ४ या पदावरील कर्मचाऱ्यांची कामे वरिष्ठांच्या लेखी व तोंडी आदेशानुसार करत आहेत. कोतवाल हे पद महसूल विभागातील गाव पातळीवर शेवटचे महत्त्वाचे पद आहे. निवडणुका व विविध शासकीय योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. गाव पातळीवरील विविध शासकीय व निम-शासकीय कर्तव्याशी बांधील राहून लोककेंद्रीत विविध योजनांच्या विस्तारासाठी कोतवाल हा महत्वपूर्ण समन्वयक समजला जातो. कोतवाल बांधवांच्या भविष्यसाध्य बाबींचा विचार करून त्यांना या पदावर नेमणूक द्यावी अशी मागणी यावेळी आमदार आवताडे यांनी सदर पत्रामध्ये नमूद केली आहे. सदरप्रसंगी जेष्ठ पत्रकार अबुक सुतार तसेच संबंधित प्रशासकीय विभागातील अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# माशांचा श्वास गुदमरतोय..

सागरी जीवन वैविध्यतेने व्यापलेले असताना तितकेच गूढही आहे. समुद्रातील लाखों प्रजाती पर्यावरण संतुलन साधण्याचे काम करत असून त्यांचे संरक्षण करणे आणि सुरक्षित ठेवणे मानवाची जबाबदारी आहे. परंतु अलिकडच्या काळात स्वार्थापोटी मानवाकडून सागरी संपत्तीचा विनाश केला जात असताना त्याचे परिणाम माशांना भोगावे लागत आहे. पृथ्वीवरचा नैसर्गिक समतोल ढासळत असून त्याचे दुष्परिणाम समुद्र जीवनावर होत आहेत. ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत असल्याने माशांचा श्वास गुदमरताना दिसत आहे. १९६० च्या तुलनेत आज समुद्रातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी असणे गंभीर समस्या मानली जात आहे. महाकाय महासागरात १७ लाख चौरस मैलपेक्षा अधिक भागात ऑक्सिजनची कमतरता जाणवत आहे. हे प्रमाण एकुण समुद्राच्या चार ते पाच टक्के आहे. पण काही ठिकाणी तर त्याचे प्रमाण पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक राहिले आहे. अर्थात ही समस्या हवामान बदलामुळे होणाऱ्या समुद्राच्या तापमानातील वाढीच्या तुलनेत आणि बदलापेक्षा आणखी गंभीर आहे. नेदरलँडच्या रेडबोर्ड विद्यापीठातील इको फिजिओलॉजिस्ट विल्को वर्बर्कच्या मते, समुद्रातील वाढत्या तापमानामुळे ऑक्सिजनमध्ये घट होत आहे. ७० अंश फॅरेनहाईटपर्यंत उष्ण होण्याची बाब ही स्वाभाविकपणे समुद्रातील ऑक्सिजन कमी करणारी आहे. जेव्हा समुद्रात ऑक्सिजन कमी होते तेव्हा माशांचे अणि अन्य समुद्री जीवांसाठी जीवन जगणे असह्य होते. कारण माशांना देखील श्वास घ्यावा लागतो. १९६० ते २०१० या काळात जगभरातील महासागरात सरासरी दोन टक्के ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाले. एका शास्त्रज्ञांच्या मते ऑक्सिजन कमी राहण्याचे प्रमाण हे या शतकाच्या शेवटपर्यंत सात टक्क्यांपर्यत पोचेल तर काही विशेष भागात जसे पूर्वोत्तर प्रशांत येथे ऑक्सिजनचे प्रमाण पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात कमी राहू शकते. त्यामुळे २५ ते ३० टक्के सागरी जीवांच्या प्रजातींनी स्थलांतर केले आहे किंवा लुप्त झाले होत आहेत. आयपीसीसीच्या २०१९ च्या अहवालानुसार १९७० ते २०१० या काळात महासागरातील काही भागात ऑक्सिजन कमी राहिल्याने मोठ्या संख्येने माशांची संख्या घटली. आता या क्षेत्रात जेलीफिशसारख्या माशांची सख्या वाढली आहे आणि हे मासे कमी ऑक्सिजनच्या स्थितीतही जीवंत राहू शकतात. जेलिफीशची संख्या तीन ते आठ टक्क्यांनी वाढली आहे. यानुसार सागरी जीवनात असामान्य रुपातून बदलत होत असल्याचे दिसून येत आहे. ईशान्य चीनच्या सागरी किनाऱ्यावर बॉम्बे डक माशांच्या प्रजातींचे प्रजनन वेगाने वाढत आहे. बॉम्बे डक ही जेलीफिशसदृश्य प्रजात असून ती कमी ऑक्सिजनमध्येही जीवंत राहू शकते आणि विशेष म्हणजे कमी ऑक्सिजन असणाऱ्या भागात त्यांची संख्या वाढत आहे. एक दशकांपूर्वी दर तासाला ४० ते ५० पौंड मासे पकडले जात असताना तेथे हे प्रमाण ४४० पौडांपर्यंत वाढले आहे. ब्रिटिश कोलंबियाच्या विद्यापीठातील मत्स्यपालन संशोधक डॅनियल पॉलीच्या मते, या माशांचे वाजवीपेक्षा अधिक प्रमाण धोक्याची घंटा मानली जात आहे. अर्थात ही वाढ सागरी जीवनांत असंतुलन निर्माण होण्याचे संकेत देत आहेत. ऑक्सिजनच्या अभावामुळे अन्य माशांच्या प्रजाती मृत झाल्या असाव्यात किंवा त्यांनी जागा बदलली असेल. बॉम्बे डक ही प्रजात कमी ऑक्सिजन असतानाही जीवंत राहू शकते. या स्थितीतून जागतिक इकोलॉजीत असंतुलन निर्माण होऊ शकते. सागरी ऑक्सिजनमधील घट होण्याची समस्या ही ग्लोबल वार्मिंगपेक्षा गंभीर आहे. कारण त्यामुळे समुद्रातील जीव, अधिवास, स्थिती तंत्र यावर गंभीर परिणाम होत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, भविष्यात समुद्र अधिक उष्ण झाल्यास ऑक्सिजनचे प्रमाण आणखी कमी रांहू शकते आणि त्यामुळे सागरी जीवनाच्या रचनेत मोठा बदल होऊ शकतो. सागरी जगातील ऑक्सिजनमधील घट ही जागतिक पर्यावरणाच्या संकटाची एक बाजू आहे. यामुळे केवळ सागरी जीवनावरच परिणाम होत नाही तर पृथ्वीवरच्या इकोसिस्टीमला देखील धोक्यात आणत आहेत. याचा गुंता सोडवायचा असेल तर ग्लोबल वार्मिंग आणि अन्य पर्यावरणीय मुद्यांना सामूहिक प्रयत्नांतून सोडवावे लागेल. एका नव्या अहवालानुसार, २०८० पर्यंत जगभरातील सर्व समुद्रांमध्ये ७० टक्के ऑक्सिजनची कमतरता जाणवणार आहे. हे संकट उभे राहण्याचे कारण म्हणजे मनुष्याकडून ज्या वेगाने प्रदूषण पसरवले जात आहे. त्यामुळे जलवायू परिवर्तन होत आहे. मानव याबाबत गांभीर्याने विचार करेल? ■

> जे.पी. मॉर्गनच्या मते, चीनची अर्थव्यवस्था नाजूक, अस्थिर आणि चिंताजनक वळणावर उभी आहे. चीनचा जीडीपी दर झपाट्याने घटत आहे. मागणी पुरवठा चक्र बिघडले आहे. मंदीच्या चक्रात सापडल्यामुळे रिअल इस्टेट उद्योगाची पडझड होत आहे आणि सार्वजनिक बांधकाम व आरोग्य क्षेत्र सुधारण्याचे साम्यवादी मधाचे बोट कोणतीही मात्रा करू शकत नाहीये. चीनची घसरगुंडी पुढे सातत्याने होत गेली तर चीनचा जगावरील दबदबा कमी होईल. काही तज्ञांनी चीनची तुलना जपानशी केली आहे. १९९० च्या दशकात सुरूवातीला रिअल इस्टेटचा फुगा फुटल्यानंतर स्थिर वाढ आणि चलनवाढीचे हरवलेले दशक जपानने अनुभवले. तसा चीनही या दुष्टचक्रातून जात आहे. जगातील दुसरी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान टिकविण्यासाठी चीनला अधिक धडपड करावी लागेल.

# मान टाकतोय ड्रॅगन

१९७८ मध्ये चीनने जगासाठी आर्थिक दरवाजे उघडले. तेव्हापासून भूतलावरील सर्वात मोठी वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था अशी तिची ख्याती झाली. १९९१ ते २०११ दरम्यान वार्षिक १०.५ टक्क्यांनी चीनची अर्थव्यवस्था पुढे सरसावत होती. शी जिनपिंग यांच्या तिसऱ्या राजवटीच्या विस्तारात अर्थव्यवस्थेला पुन्हा ग्रहण लागले आहे. २०२१ च्या दशकात प्रारंभी विकास वेग ६.७ टक्के होता. पण तो आता घसरत आहे. वाढीची गती मंद होत आहे. समस्याग्रस्त रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये सुधारणा होण्याचे चिन्ह दिसत नाही. दीर्घकालीनदृष्टीने विचार करता, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीही उदास झाली आहे. २०२३ मध्ये चीनचा विकास दर ५.४ टक्क्यापर्यंत खाली आला. २०२८ मध्ये हळूहळू ३.५ टक्क्यापर्यंत घसरेल अशी भीती व्यक्त केली जात आहे.

जे.पी. मॉर्गन इंडेक्सच्यावतीने जे भविष्यकथन करण्यात आले आहे, त्यानुसार चीनला मागे टाकून भारत आता एक प्रभावी अर्थव्यवस्था म्हणून जगात उदयास येत आहे. कुठल्या क्षेत्रात भारत चीनपेक्षा पुढे आहे, भारताची ही ताकद का व कशी वाढत आहे, चीन कशामुळे मागे पडत आहे, या प्रश्नांची उत्तरे या लेखात दिली आहेत. जे. पी. मॉर्गन ही एक तटस्थ वित्तीय भविष्यकथन करणारी संस्था म्हणून नावारूपास आलेली आहे. प्रतिभाशाली विद्वान अर्थशास्त्रज्ञांचे समूह आणि बाजारपेठ संशोधकांची फळी त्यामागे कार्यरत असते. चीनची अर्थव्यवस्था गेल्या ६ महिन्यापासून मंदावत आहे आणि तिचे भावी स्वरूप दोलायमान बनले आहे. या संस्थेने व्यक्त केलेला हा अंदाज साधार आहे. तर्कसंगत आहे. कारण चीनमध्ये बुडत असलेल्या बँका, रिअल इस्टेट क्षेत्रात होत असलेली पडझड आणि चिनी तरूणांना बेकारीच्या संकटाशी द्यावी लागत असलेली झुंज यामुळे हे संकट अधिक गडद होत आहे. ती मजबूत करण्यासाठी चीनला धाडसी पावले टाकावी लागणार आहेत. परंतु चीनच्या अर्थव्यवस्थेपुढे पाच महत्त्वाचे प्रश्न उभे आहेत. त्यामध्ये वृद्ध होत असलेली लोकसंख्या, कोविडनंतर बिघडलेली मागणी पुरवठा साखळी, कुशल तंत्रज्ञांच्या संख्येतील घट, आरोग्य सेवेतील चढउतार, सार्वजनिक खर्चातील वाढ आणि वित्तीय तूट तसेच कर्जाचा बोजा अशी अनेक कारणे त्यामागे आहेत.

२०२४ मध्ये आर्थिक वाढीला उत्तेजन देण्यासाठी चीन प्रयत्न करीत आहे. परंतु या काळातील अडचणींचे डोंगर पाहता, चीनला अशी वाढ मोठ्या प्रमाणात करण्यात अनेक अडचणी आहेत. २०२३ आर्थिक वर्ष अत्यंत वाईट गेले. २०२४ आणखी वाईट असू शकते काय? आता चीनपुढे वाईटातून चांगले करण्याचे आव्हान आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात उत्तेजन मिळण्याची शक्यता का नाही याचे आणखी एक कारण म्हणजे चीनमधील वाढती बेकारी आणि तरूणांचा असंतोष हे होय. मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाबतीत आव्हाने कायम राहिल्यामुळे गृहनिर्माण क्षेत्रातील अडचणी चीन दूर करू शकेल काय? अशीही शंका व्यक्त केली जात आहे. गृहनिर्माण बाजारपेठेतील सुधारणांचा वेग कायम ठेवण्यात अनेक अडचणी येत आहेत व चीन त्यामुळे गडबडला आहे. या क्षेत्रातील डॅमेज कंट्रोल करण्यासाठी चीनने आता सार्वजनिक गृहनिर्माण योजनांना गती दिली आहे. परंतु त्यातही मोठी गुंतवणूक आहे व अनेक अडचणी समोर येत आहेत. २०२४ मध्ये चलनवाढ संपेल असा चिनी अर्थशास्त्रज्ञांचा होरा होता. पण तो साफ चुकला आहे. चलनवाढ रोखण्यास चीनच्या मध्यवर्ती बँकेनी तकलादू उपाययोजना करूनही कमालीचे अपयश आले आहे. त्यामुळे चीनची चिंता वाढली आहे. शून्य कोरोना धोरणातून मोठा विरोध झाला. चीन कोरोनातून बाहेर पडला. २०२३ मध्ये आर्थिक पुनर्प्राप्तीसाठी मोठमोठी स्वप्ने पाहिली. परंतु याबाबतीत यशापेक्षा अपयशच अधिक पदरी पडले. कोरोना साथीनंतर आर्थिक पुनर्प्राप्तीसाठी चीनने तीन आघाड्यांवर विशेष प्रयत्न केले. पहिले म्हणजे बांधकाम उद्योगात नवचैतन्य आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. दुसरे म्हणजे पर्यटन वाढीसाठी दरवाजे उघडण्यात आले. सांस्कृतिक देवाणघेवाणीला चालना देण्यात आली. तिसरे म्हणजे औद्योगिक उत्पादन वाढवून पडत्या अर्थकारणाला भक्कम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण तरीही अर्थव्यवस्थेचा सुस्त झालेला अजगर हलायला तयार नाही. बहुतेक अर्थशास्त्रज्ञांना असे वाटते की, जगातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था यावर्षी सुमारे ५ टक्के अधिकृत वाढीचे लक्ष्य कसे गाठणार? गेल्या ६ महिन्यात उलट आर्थिक घडी विस्कटत चालली आहे.

चिनी अर्थव्यवस्थेचे आजचे चित्र अत्यंत भेसूर आणि विदारक आहे. चीनपुढे असलेल्या आर्थिक समस्यांचा डोंगर पाहता, चीनने केलेले उपाय अत्यंत तोकडे आणि अपुरे आहेत. या उपायांचा परामर्श घेता असे दिसते की, मोठे प्रयत्न करून, मोठ्या अपेक्षा ठेवूनही आर्थिक वाढीला उत्तेजन देण्यास चीनला

**प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर**

अपयश आले आहे. डेरेक सिझर्स यांच्या मते, चीनपुढे हे आव्हान असणार आहे की, एकूण विकासाची दिशा संकटामुळे उच्च असण्याऐवजी ती खाली खोल दरीत नेणारी आहे. पूर्वी चीनच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची अपेक्षा ५.२ होती. चीनच्या अर्थव्यवस्थेला रिअल इस्टेट क्षेत्राने मोठा धक्का दिला आहे, असा अभ्यासपूर्ण अंदाज आहे. १९९० पासून गृहनिर्माण क्षेत्रात पडझड सुरू झाली. २००९ पासून तिला अधिक अवकळा आली आणि आता यावर्षी पुन्हा २ टक्क्यांनी घसरण झाली आहे. रिअल इस्टेट हे चीनला उर्जितावस्थेत नेणारे व महानगरांना चमकविणारे क्षेत्र आहे. शहरे व ग्रामीण विकासातील अंतर झपाट्याने कमी होत होते. पण आता ही मंदी या उद्योगातील खाजगी गुंतवणूकदारांना धास्ती निर्माण करणारी आहे. सार्वजनिक क्षेत्रात सरकार स्वतः उडी घेत आहे. पण त्यातून काही संजीवनी मिळेल असे वाटत नाही.

चीनमध्ये मागणी व पुरवठ्याचे गणित कोविड–१९ पासून बिघडले आहे. त्यांच्या झिरो कोविड धोरणाचा पराभव झाला. आता युक्रेन–रशिया व हमास–इस्त्राईल या दोन युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी बिघडली आहे. महागाई वाढली आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार पुरवठा केला जात नाही. बहुतांश ग्राहकांच्या मागणीस प्रतिसाद देणाऱ्या पुरवठा व्यवस्था कमकुवत राहिल्या आहेत आणि चलनवाढीचा धोका कायम आहे. आर्थिक आकुंचन वाढले आहे. त्याचा फटका अमेरिकेप्रमाणे चीनलाही बसत आहे. निरोगी उत्पादकांना संकुचित होण्याच्या उंबरठ्यावर ढकलले जात आहे. मंदीचे संकट मोठ्या सावलीने बँकींग क्षेत्रावरही गडद छाया टाकीत आहे. त्यामुळे दिवाळखोर वाढत असून गुंतवणूकदार देशभर निदर्शने करीत आहेत. स्थानिक सरकारे कर्जबाजारी झाली असून आर्थिक अडचणीशी झुंजत आहेत. काही शहरे व सरकारे कर्ज फेडू शकत नाहीत. त्यांना मुलभूत सेवा कमी कराव्या लागत आहेत. ज्येष्ठांसाठीच्या वैद्यकीय लाभांना कात्री लावली जात आहे. त्यातून असंतोषात भर पडत आहे.

पुरेसा खप का नाही? कोरोना साथीतून उठल्यानंतर चीनने आपली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी बरेच प्रयत्न केले. पण त्यात अजूनही यश आलेले नाही. याउलट, भारत एवढ्या गतीने या संकटातून बाहेर पडला की, जग तोंडात बोट घालून पहातच राहिले. चीनमधील जीडीपी वाढीसाठी किरकोळ विक्री आणि उपभोगाचे प्रमाण पाहिले असता गणित कसे बिघडले आहे हे लक्षात येते. कोरोना काळानंतर अर्थव्यवस्थेतील उपभोगास पाठिंबा देण्यासाठी पुरवठा साखळी अजून मजबूत झाली नाही. अगदी उच्च, मध्यम कुटुंबांनासुद्धा उपभोग्य वस्तूंच्या पुरेशा प्राप्तीसाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे चीनमध्ये मागणी अजूनही पुरेसा खप का नाही याची चिंता वाटू लागते. हेही अर्थव्यवस्था बिघडण्याचे आणखी एक कारण आहे. तरुणांची बेकारी इतकी बिकट झाली आहे की, सरकारने आकडेवारी प्रकाशित करणे बंद केले आहे. पण त्यामुळे प्रश्न सुटत नाहीत. फक्त साम्यवादी पक्षाला थोडा सुस्कारा मिळतो. बिजिंगच्या वाढत्या छाननी तंत्रामुळे परदेशी कंपन्या सावध झाल्या आहेत आणि त्या चीनमधून बाहेर पडत आहेत. तिसऱ्या तिमाहीत १९९८ नंतर प्रथमच चीनमध्ये थेट विदेशी गुंतवणुकीचे (एफडीआय) प्रमाण नकारात्मक झाले आहे.

भूमिका कशी बदलेल? बदलत्या भूराजनैतिक आणि आर्थिक लँडस्केपमध्ये पुरवठा साखळी राखणे हे सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे. चीनला हे कसे जमेल? जागतिक अर्थव्यवस्थेच्या गतिशीलतेवर चीनच्या भूमिकेमुळे काही परिणाम होईल का? हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. चार दशकातील गतिमान वाढीमुळे चीन जगातील आर्थिक उत्पादनाचे वेगवान केंद्र बनला. २०२२ मध्ये जीडीपीच्या १८ टक्के एवढा त्याचा उत्पादनाचा वाटा होता. उत्पादन मूल्यवर्धित प्रमाण ३० टक्के होते. पण आता चीनची ही भूमिका हळूहळू कमजोर, कमकुवत होत आहे. शांघायमधील अमेरिकन चेंबर्स ऑफ कॉमर्सने सप्टेंबरमध्ये केलेल्या सर्वेक्षणात असे आढळले आहे की, केवळ ५.२ टक्के प्रतिसादकर्ते त्याच्या ५ वर्षाच्या व्यावसायिकदृष्टीकोनाबद्दल आशावादी होते. १९९९ साली पहिल्यांदा असे आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले. तेव्हापासून आजतागायत आर्थिक विकासाची ही सर्वात खालची पातळी आहे.

समारोपः मॉर्गन तज्ञसमूहाचे असे म्हणणे आहे की, चीनची अर्थव्यवस्था आता हळूहळू डबघाईला येत आहे. चीनची उतरण, चीनची घसरगुंडी पुढे सातत्याने होत गेली तर चीनचा जगावरील दबदबा कमी होईल. जागतिक पुरवठा केंद्र म्हणून चीनची भूमिका कमकुवत होत आहे. पुरवठा साखळी पुनर्स्थापित करणे हे एका रात्रीत शक्य नाही. त्याचा परिणाम चीनच्या सरसकट अर्थव्यवस्थेवर होत आहे, हे कटू सत्य आहे. चीन मोठ्या आर्थिक संकटातून वाटचाल करीत आहे. चीनची वाढ मंद होत असताना काही तज्ञांनी त्याची तुलना जपानशी केली आहे. १९९० च्या दशकात सुरूवातीला रिअल इस्टेटचा फुगा फुटल्यानंतर स्थिर वाढ आणि चलनवाढीचे हरवलेले दशक जपानने अनुभवले. तसा चीनही या दुष्टचक्रातून जात आहे. तत्काळ असे काही चीनमध्ये घडेल असे वाटत नाही. परंतु २०२० च्या दशकातील प्रगतीचे चित्र चीनमध्ये आज दिसत नाही हे सत्य आहे. चीनची जीडीपी वाढ शून्याच्यावर राहील. परंतु ती पूर्वीइतकी ताकदवान राहणार नाही. जगातील दुसरी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान टिकविण्यासाठी चीनला अधिक धडपड करावी लागेल. चीनची लोकसंख्या १४१ कोटी झाली आहे. १९९१ नंतरची ही पहिलीच घट आहे. लोकसंख्या शास्त्राच्या आधारेसुद्धा चीनला विकासाचे नवीन गणित मांडावे लागणार आहे. आर्थिक आकुंचनामुळे २०४० च्या दशकात चीनपुढे अनेक बिकट आर्थिक समस्या असतील. तेव्हा शी जिनपिंग यांना त्यांचे नवे अर्थशास्त्र मांडावे लागेल. ■

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२४**

भाद्रपद कृ. ८ बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू अविधवा नवमी, नवमी श्राद्ध

**सूर्योदय :** स.०६.०५ **सूर्यास्त :** सायं.०६.०५ वा

**नक्षत्र** : आर्द्रा, योग : वरियान, **करण :** तैतिल

**राहू काळ : दुपारी :** १२:०० ते १:३०

**दिनविशेष**

*१८५७: ब्रिटिशांनी लखनौ परत जिंकून घेतले व तेथील ब्रिटिश नागरिकांची कैदेतून सूटका केली. *१८६६: थॉमस हंट मॉर्गन यांचा जन्म, त्यांनी आनुवंशिकता ही गुणसुत्रांवर असलेल्या जीनवर अवलंबून असते, हे सिद्ध केले. *१८८१: मराठी कथाकार आणि विनोदकार गोपाळ गंगाधर लिमये या नावाने त्यांनी लेखन केले. *१९१५: होम रुल लीग स्थापना करण्याचा ॲनी बेजंट यांचा निर्णय *१९१६ : पं. दिनदयाळ उपाध्याय जन्मदिन *१९१९ : काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना *१९२२ : बॅ. नाथ पै जन्मदिन *१९२६:प्रसिद्ध नाटकार व अभिनेते बाळ कोल्हटकर यांचा जन्म *१९३०: कायदेभंग चळवळीत चिरनेर येथे सत्याग्रहाच्या वेळी पोलिसांचा गोळीबार *१९४६: बिशनसिंग बेदी या महान भारतीय गोलंदाजाचा जन्म *१९५६: इंग्लंड आणि अमेरिकेदरम्यान टाकलेली टेलिफोन केबल कार्यान्वित झाली. *१९८४: सुवर्णमंदीरातील सर्व लष्कर काढून घेण्यात आले *१९९३: उद्योगपती रसिकभाई शहा यांचे निधन

**राशीभविष्य**

*मेष : जीभेचे लाड पुरवाल. *वृषभ : मनाविरुद्ध वागावे लागेल. *मिथुन : आनंददायक दिवस. *कर्क : घराची सजावट कराल. *सिंह : छोटा प्रवास कराल. *कन्या : धनलाभ होईल. *तुळ : अपेक्षा पूर्ती होईल. *वृश्चिक : कामात गोंधळ करु नका. *धनु : तुमचे महत्व वाढेल. *मकर : मोठ्या व्यक्तींकडून प्रशंसा. *कुंभ : हितचिंतक मदत करतील. *मीन : आळसाने कामे लांबवाल.

**मेसेज आया**

काही शब्द असतातच असे की,
नेहमीच ऐकावेसे वाटतात.
काही नाती असतातच एवढी मोठी की,
ती कधीच संपू नये असचं वाटतं.
आणि काही माणसं असतातच अशी की,
ती नेहमी आपलीच असंच वाटतं.
अगदी शेवटपर्यंत....



**व्यक्तीविशेष**

## पं. दीनदयाळ उपाध्याय

पं. दीनदयाळ उपाध्याय यांची एक तत्वचिंतक, अर्थतज्ज्ञ, पत्रकार आणि राजकीय शास्त्रज्ञ म्हणून भारतीयांना ओळख आहे. भारतीय जनसंघाचे ते सर्वांत महत्वाचे नेते होते. २५ सप्टेंबर १९१६ रोजी दीनदयाळ यांचा जन्म उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यातील चंद्रभान नावाच्या गावात झाला. महाविद्यालयात शिकत असतानाच मित्र बाळूजी महाशब्दे यांच्यामुळे ते रा.स्व संघाच्या संपर्कात आले. रा.स्व संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यांनी संघाच्या कामात स्वतःला झोकून दिले. ते संघाचे प्रचारक बनले. दीनदयाळ उपाध्याय आदर्शवादी होते, कुशल संघटक होते. १९५१ मध्ये श्यामप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. त्यांच्या मदतीसाठी दीनदयाळ उपाध्याय यांनी संघाने पाठवले. त्यांच्या कामाचा झपाटा आणि कौशल्य पाहून श्यामप्रसाद मुखर्जी म्हणाले होते, मला जर दोन दीनदयाळ मिळाले तर मी भारतीय राजकारणाचा चेहरा बदलून टाकीन. १९५३ मध्ये मुखर्जी यांच्या निधनानंतर दीनदयाळ उपाध्याय यांनी जनसंघाची धुरा सांभाळली. ११ फेब्रुवारी १९६८ रोजी त्यांची हत्या झाली.

**बोधकथा**

## रामा पैलवानाचं तिकीट

शिवापूरमधून बस बाहेर पडली. काही स्टेशन आली आणि गेली. लोक चढत होते, उतरत होते. पुढचा स्टॉप आला आणि रामा पैलवान गाडीत चढला. चांगलाच आडदांड होता तो. सहा फुटावर उंची आणि कमावलेलं शरीर. त्याला बघूनच कंडक्टरला धडकी भरली. पैलवान दोन सीटांवर एकटाच बसला आणि म्हणाला, राम पैलवान तिकीट काढणार न्हाई. त्याच्यासमोर अगदीच किरकोळ असणाऱ्या कंडक्टरला हे काही बरे वाटत नव्हते. पण रामा पैलवानाचा मुकाबला कसा करायचा? कंडक्टरने आपले शरीर कमवायला सुरूवात केली. भरपूर व्यायाम, पौष्टीक आहार घेऊन त्याने आपले शरीर कमावले, मग एके दिवशी गाडीत पैलवान तिकिट काढणार न्हाई. आता शरीर कमावलेल्या कंडक्टरने त्याच्याकडे रागाने बघत विचारले, का तिकिट काढणार नाही? रामा पैलवानाने चमकून कंडक्टरकडे पाहिले आणि म्हटले, कारण पैलवानाकडं बसचा पास हाय. **तात्पर्यः–** समस्या सोडवण्याचा आटापिटा करण्याआधी ती मुळात आहे की नाही हे डोळसपणे पहा.

**भूगोल**

## वनस्पती – मूळ

जमिनीखाली असलेल्या वनस्पतीच्या अवयवाला मूळ असे म्हणतात. मुळाची तीन मुख्य कामे असतात. एक म्हणजे वनस्पतीला जमिनीत घट्ट रूजवणे, दुसरे मातीच्या कणांमधील अवकाशातून पाणी आणि क्षार शोषून घेणे. मुळांवरील केसांमुळे त्यांच्यातील शोषून घेण्याची क्षमता वाढते. हे केस मुळाच्या टोकामागे असतात त्यांना मूलरोम म्हणतात आणि त्यामुळे मूळ जास्तीत जास्त पोषक द्रव्ये घेऊ शकते. तिसरे म्हणजे वनस्पतीच्या दळणवळण व्यवस्थेचा मूळ एक महत्वाचा भाग असतो. वनस्पतीतील झिलेम हा घटक मुळातून पाणी आणि क्षार खोड आणि पानांपर्यंत पोचवतो तर फ्लोएम हा घटक पानांतून पोषक द्रव्ये मुळाच्या सर्व भागांपर्यंत पोचवतो. याशिवाय काही मुळे उदा. गाजर अन्नसाठा करतात. मुळांवर एक संरक्षक कवच असते, त्यामुळे जमिनीखाली वाढताना तेथील दबावापासून त्यांचे रक्षण होते. (क्रमशः)

**नवं संशोधन**

## मंगळाच्या ध्रुवावर कार्बन डायऑक्साईड अधिक

मंगळाबाबत सध्या जे वेगवेगळ्या प्रकारचे संशोधन सुरु आहे, त्यामध्ये तेथील वातावरणात असलेल्या वायूंबाबतच्या संशोधनाचाही समावेश होतो. आता 'नासा'च्या मार्स रेकनसान्स आर्बिटर यानाला मंगळाच्या वातावरणात वेगवेगळ्या प्रकारांतील कार्बन डायॉक्साईड सापडला असून यापूर्वीच्या कल्पनेपेक्षा तेथील ध्रुवांवर मोठ्या प्रमाणात कार्बन डायॉक्साईड आहे. मंगळाच्या विषुववृत्तावरील धुळीचे प्रदेश ध्रुवीय भागांप्रमाणेच थंड पडतात. तेथे कार्बन डायॉक्साईडचे धुके पृष्ठभागालगत असते व रात्रीच्या कमी तापमानाला हे घडत असते, सकाळच्या वेळी या धुक्याची वाफ होऊन जाते. मंगळाच्या वातावरणात कार्बन डायॉक्साईड आहे व ध्रुवीय प्रदेशात हरितगृह वायूंचे मोठे साठे आहेत. तेथील जास्त उंचीवरील भागात कार्बन डायॉक्साईडचे धुके आहे व ती पूर्वीपासून आहे, असे वैज्ञानिकांचे मत आहे. हे धुके हे गरम झऱ्यांसारख्या लहान विस्फोटामुळे असावे. तुम्ही त्या तापमानाला पोहोचता तेव्हा जास्त धुके तयार होते. त्यामुळे ध्रुवीय भागातही पृष्ठीय तापमान कमी अक्षांशाच्या भागात असते तेवढे कमी नसते. मंगळावरील थॅरसिस, अरेबिया व एलीसियम या भागात मध्यम व कमी अक्षांशाच्या भागात कार्बन डायॉक्साईडचे धुके आढळून आले आहे, कारण तेथील रात्री खूप थंड असतात.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४४७**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 2 | | |
| | 3 | | 2 |
| 3 | | 2 | |
| | | 1 | |

**क्रमांक ४४६ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 2 | 3 | 1 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |

**हास्यविनोद**

बन्या त्याची बायको बनीचा वाढदिवस विसला. त्या दिवशी संध्याकाळी ऑफीसमधून तो घरी आला तेव्हा बनी त्याच्यावर ओरडत म्हणाली, पुढचे दिवस मी तुला दिसलेच नाही तर तुला कसे वाटेल? बन्या शिटी मारत म्हणाला, अरे वा, दिल गार्डन गार्डन हो जाएगा. सोमवार गेला, त्याला बनी दिसली नाही, मंगळवार गेला, त्याला बनी दिसली नाही. शुक्रवारी कुठे त्याच्या डोळ्याची सूज कमी झाली आणि डोळ्यांच्या कोपऱ्यातून थोडी थोडी त्याला बनी दिसू लागली.!

**महिलायन**

## घातक स्वयंपाकघर

ग्रामीण भागात आजही अनेक स्वयंपाक घरांमध्ये अन्न शिजवण्यासाठी लाकूड, कोळसा यांचा वापर होतो. त्यापासून निघणारा धूर सिगारेट, विडी यांच्या धुरापेक्षाही घातक असून त्यापासून अनेक विकार जडून त्यामुळे मृत्यू संभवतो. बदलत्या काळाबरोबर गावाच्या स्थितीत बदल झाले असले तरी स्वयंपाकघरांची स्थिती मात्र तीच आहे.

सरकारी योजनांची अंमलबजावणी करत ग्रामीण भागाच्या प्रगतीचे रस्ते खुले झाले. घरापर्यंत वीज पोहोचली, शौचालयं निर्माण झाली. शाळा आल्या. अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणी बदल झाले. पण, स्वयंपाक घरांच्या स्थितीत मात्र काही बदल झाला नाही. गॅस सिलेंडरची सुविधा आहे, पण तो आणण्यासाठी दूर जावं लागत आहे. शिवाय ग्रामीण भागात प्रत्येक घरात एलपीजी गॅस आहे, असंही नाही. आजही ग्रामीण भागांमध्ये अनेक घरांमध्ये स्वयंपाक बनवण्यासाठी लाकडाचाच वापर केला जातो. त्यामुळे स्वयंपाकघरांची अवस्था फार धोकादायक झाली आहे. कारण त्याचा धूर बाहेर जाण्यासाठी ना खिडकी असते ना चिमणी. (पूर्वार्ध)

**घरगुती औषध**

## कोरफड

कोरफड अग्निदीपक आहे. भूक लागत नसल्यास कोरफडीचा रस पोटात घ्यावा. हिची रूंदी दोन पाने घेऊन किंचीत विस्तवावर शेकावी. नंतर ती पाने सोलून आतील गर काढावा व एका फडक्यात धरून घट्ट पिळावा. अशा रितीने काढलेला रस सुमारे ५ ग्रॅम घेऊन त्यात संध्येच्या पळीभर मध घालावा व रोज सकाळी घ्यावा. शौचास साफ होते. उत्तम भूक लागते असा रस चाळीस दिवस जाणत्या माणसाने घेतल्यास अग्निमांद्य व त्यापासून आलेली क्षीणता दूर होते. कोरफड पित्तशामक आहे. पित्तकर प्रकृतीच्या माणसांनी वरील प्रमाणे काढलेला रस ३ ग्रॅम (लहान दोन चमचे) घेऊन थोंडी खडीसाखर घालून घेत जावी. थोड्यात दिवसात कडकी कमी होते. कोरफड कफ नाहीसा करणारी आहे.



**मराठी व्याकरण**

## पद म्हणजे काय?

एखाद्या शब्दाला किंवा शब्दसमूहाला पूर्ण अर्थ प्राप्त झाला तर त्याला आपण वाक्य म्हणतो. 'मासे पाण्यात पोहतात' या वाक्यात तीन पदे आहेत. 'पाणी' हा शब्द आहे. 'पाण्यात' हे पद आहे. वाक्यात वापरताना शब्दाच्या मूळ स्वरुपात बदल करून त्या शब्दाचे जे रूप तयार होते त्यास पद असे म्हणतात. पण व्याकरणामध्ये पदांनाही स्थूलमानाने शब्द असे म्हटले जाते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## पोलिस निरीक्षक संजय शिंदे यांचा महत्वपूर्ण जबाब

# अक्षयचा रुद्रावतार पाहूनच गोळीबार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** दोन चिमुरड्या मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेचा सोमवारी रात्री पोलिसांनी एन्काऊंटर केला. हाती पिस्तुल घेऊन कोणालाही सोडणार नाही अशी अक्षयने धमकी दिली व त्यानंतर हवालदार महेश तावडेंच्या दिशेने दोन राऊंड फायर केल्या. तो आणखी गोळ्या झाडेल अशी खात्री पटल्यानेच पोलिसांनी गोळीबार केल्याचे पोलिस निरीक्षक संजय शिंदे यांनी म्हटले आहे. या कारवाईमध्ये संजय शिंदे यांच्यासह सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे जखमी झाले आहेत. अक्षय शिंदेवर गोळी झाडणाऱ्या संजय शिंदेंच्या जबाबानंतर मुंब्रा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुंब्रा पोलिसांनी नोंदवलेल्या गुन्ह्यात घटनेचा विस्तृत उल्लेख केला आहे.

शिंदे आपल्या जबाबात म्हणाले, सोमवारी सकाळी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन अक्षय शिंदेला ताब्यात घेतले. आम्ही ठाण्याच्या दिशेने निघालो. या वेळी मी व्हॅनमध्ये पुढे बसलो होते. तर अक्षय आणि सपोनि निलेश मोरे आणि दोन अंमलदार मागे बसले होते. शिळ डायघर पोलीस ठाण्याजवळ आले असताना निलेश मोरे यांनी मला त्यांच्या मोबाईल फोनवरुन फोन करुन, 'अक्षय शिंदे हा मला तुम्ही पुन्हा कशासाठी घेऊन जात आहात? आता मी काय केले आहे?,' असे रागाने बोलत असून शिवीगाळ करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे मी वाहन थांबवून आरोपीला शांत करण्याच्या उद्देशाने मागे येऊन बसलो. आम्ही मुंब्रा बायपास रोडवर मुंब्रा देवीच्या पायथ्याजवळ आलो असता सायंकाळी ६.१५ च्या सुमारास आरोपी अचानक निलेश मोरे यांच्या कमरेला पॅन्टमध्ये खोचलेले सरकारी पिस्तुल बळाचा वापर करुन खेचू लागला. त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. पिस्तुल हिसकवताना सुरू असलेल्या झटापटीत आरोपी मला जाऊ द्या, म्हणत होता. झटापटीमध्ये सपोनि निलेश मोरे यांचे पिस्टल लोड झाले व त्यातील १ राउंड मोरे यांच्या डाव्या मांडीमध्ये घुसल्याने ते खाली पडले. त्यावेळी आरोपी अक्षयने मोरे यांच्या पिस्तुलचा ताबा घेऊन 'आता मी एकालाही जिवंत सोडणार नाही,' असे रागारागाने ओरडू लागला. त्यानंतर अक्षयने माझे व हरिश तावडे यांच्या दिशेने हातातील पिस्तूल रोखून आम्हाला जीवे मारण्याच्या उद्देशाने आमच्यावर २ गोळ्या झाडल्या. परंतु आमच्या नशिबाने त्या आम्हाला लागल्या नाहीत.



### विश्वस्तांवर मानवी तस्करीचा आरोप!

**बदलापूर :** बदलापूरच्या ज्या शाळेत अक्षयने लहान मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे, त्या शाळेच्या विश्वस्त मंडळाविरुद्ध माहिती अधिकार कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेत केतन तिरोडकर यांनी अनेक धक्कादायक आरोप केले आहेत. त्यानुसार बदलापूरच्या शाळेतील विश्वस्तांवर मानवी तस्करी आणि चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

तसेच बदलापूरमध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा गुन्हा नोंद झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्या शाळेतून अन्य एक मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

याप्रकरणात काही बड्या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे याप्रकरणाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. उच्च न्यायालयात लवकरच या जनहित याचिकेवर सुनावणी होणार आहे.

### प्रसंगावधान राखत गोळीबार

● आरोपी अक्षयचे रौद्र रुप व देहबोली पाहून तो त्याच्याकडील पिस्तुलमधून आमच्यावर गोळ्या झाडून आम्हाला जीवे मारणार अशी माझी पूर्णपणे खात्री झाली म्हणून मी प्रसंगावधान राखत स्वसंरक्षणार्थ माझ्याकडील पिस्तुलाने एक गोळी आरोपी अक्षयच्या दिशेने झाडली. त्यात आरोपी जखमी होऊन खाली पडला आणि त्याच्या हातातील पिस्तुलचा ताबा सुटला, त्यानंतर आम्ही आरोपी अक्षय याच्यावर नियंत्रण मिळवले आणि वाहन जवळच्या छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पीटल, कळवा येथे आणून मी, अक्षय शिंदे व निलेश मोरे औषधोपचारासाठी दाखल झालो. आरोपीचा दवाखान्यात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाल्याचे मला नंतर समजले.

### 'काही लोकांना वाचवण्यासाठी मुलाचा बळी'

**बदलापूर :** बदलापूरच्या अक्षय शिंदेचा मृत्यू झाल्यानंतर अक्षयच्या आई-वडिलांनी पोलिसांवर बदलापूरच्या शाळेच्या संस्थेतील काही लोकांना वाचवण्यासाठी आमच्या मुलाचा बळी देण्यात आला, असा आरोप केला.

अक्षयचा एन्काऊंटर झाल्यानंतर सोमवारी रात्रीपासून त्याचे पालक आणि नातेवाईक कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाबाहेर ठाण मांडून बसले होते. आम्हाला आमच्या मुलाला बघू द्या, अशी विनवणी अक्षयचे पालक करत होते. मात्र, अक्षयच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्याशिवाय तुम्हाला मृतदेह पाहता येणार नाही, असे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे रात्रभर अक्षयचे पालक आणि नातेवाईक कळवा रुग्णालयाच्या परिसरात होते. यावेळी अक्षयच्या कुटुंबीयांना, सध्या तुम्ही कुठे राहत आहात, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर अक्षयच्या आई-वडिलांनी आम्ही रेल्वे स्टेशनवर राहत असल्याचे सांगितले.

'आम्ही रोज स्टेशनवरच्या कुठल्या कोपऱ्यात कचऱ्यामध्ये झोपतोय, हे आम्ही तुम्हाला दाखवतो. तिकडेही पोलीस आम्हाला मारतात. अक्षयला पोलिसांनी पकडले तेव्हापासून आम्ही स्टेशनवर राहत आहोत, मीडियासमोर आलेलो नाही. आता या प्रकरणातील दोषींना शिक्षा झाली पाहिजे. त्याशिवाय, आम्ही मुलाचा मृतदेह ताब्यात घेणार नाही', असा पवित्रा अक्षयच्या आई-वडिलांनी घेतला आहे.

### मृतदेहाचा एक्सरे काढणार

**ठाणे :** लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या मृतदेहाचे जेजे रुग्णालयात शवविच्छेदन करण्यापूर्वी मृतदेहाचा एक्सरे करण्यात येणार आहे. शवविच्छेदन झाल्यावर कुटुंबीयांच्या ताब्यात मृतदेह देण्यात येणार आहे. कळवा रुग्णालयात न्यायाधीशांच्या उपस्थितीत पंचनामा झाला होता. तीन डॉक्टरांच्या उपस्थितीत अक्षयचे शवविच्छेदन करण्यात येणार आहे. अक्षय शिंदेच्या पोस्टमार्टमचे व्हिडीओ रेकॉर्डिंग देखील करण्यात येणार आहे.

**पोस्टमार्टम झाल्यानंतर अक्षय शिंदेचे शव त्याच्या कुटुंबियांच्या ताब्यात दिले जाईल.**

जे.जे. हॉस्पिटलच्या डीन डॉ. पल्लवी सापळे म्हणाल्या, आम्हाला पेपर मिळताच आम्ही पोस्टमार्टम सुरू करणार आहोत. सरकारने घालून दिलेल्या नियमावलीनुसार पोस्टमार्टमचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणार आहे. त्यानंतर मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देणार आहोत.

अक्षय शिंदेने केलेल्या फायरिंगमध्ये गोळी निलेश मोरे यांच्या पायातून आरपार निघून गेली. या घटनेनंतर गाडीतील दोन पोलिस कर्मचाऱ्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास झाला. या घटनेत अक्षयच्या डोक्याला गोळी लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.



### मीरा बोरवणकरांना भेटण्याची इच्छा?

तिरोडकर यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेतील आणखी एक मुद्दा आहे. अक्षय शिंदे याने तुरुंगात असताना आयपीएस मीरा बोरवणकर यांना भेटण्याची इच्छा पोलिसांकडे बोलून दाखवली होती. आरोपी हायकोर्टाने स्थापन केलेल्या विशेष समितीपुढे गेला तर प्रकरण वेगळ्याच वळणार जाईल, या भीतीने त्याचा एन्काऊंटर झाल्याचा गंभीर आरोप याचिकेतून करण्यात आला आहे. ट्रस्टी आणि शाळेतून सीसीटीव्ही गायब करणारा कर्मचारी अद्याप फरार असल्याने ठाणे पोलीस आणि एसआयटीच्या कारभारावरही सवाल उपस्थित करण्यात आले आहेत.

अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली होती. मात्र, आता याप्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सुपूर्द केला जाण्याची शक्यता आहे.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीत गटबाजी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नाशिक :** शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सभेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे आणि राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांसमोरच विधानसभा निवडणुकीच्या इच्छुक उमेदवारांच्या यादीवरून नाशिकचे शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षांमध्ये चांगलीच जुंपली. यामुळे नाशिकमधील शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील गटबाजी चव्हाट्यावर आल्याचे दिसून आले.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा नाशिक जिल्ह्यात दाखल झाली आहे. जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड यांनी जिल्ह्यातील इच्छूकांची यादी जाहीर केली होती. यानंतर जयंत पाटील यांच्यासमोरच शहराध्यक्ष गजानन शेलार यांनी जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड यांच्या संदर्भात 'आव्हाड यांना पक्षाच अध्यक्ष केलं तर ते महाराष्ट्र मुकवतील', असे वक्तव्य केले.

तर जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड यांनी गजानन शेलार यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. मारणाऱ्याचा हात धरू शकतो, बोलणाऱ्याचे तोंड नाही. त्यांना माझ्याबद्दल असे का म्हणायचे होते मला अजूनही समजले नाही. असे जाहीर वक्तव्य करणे टाळायला पाहिजे. एखाद्याच्या स्वभावाला औषध नसते. अशा स्वरूपाच्या विधानामुळे पक्ष वाढीवर परिणाम होतो. आम्ही पक्ष वाढीसाठी संपूर्ण जिल्ह्यात रक्ताचे पाणी केले आहे. अर्ज आणि डीडी जयंत पाटील आणि शरद पवार यांच्याकडे दिले आहेत. त्यांनी शहराची यादी दिली की नाही हे माहिती नाही, असा पलटवार आव्हाड यांनी केला.

दरम्यान, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख यांनी शेलार यांच्या विधानाची सारवासारव केल्याचे दिसून आले. 'शेलार स्पष्ट बोलतात, त्यांच्या पोटात जे तेच ओठावर असतं. गजानन शेलार आमदार व्हावेत, अशी आमची इच्छा आहे', असे त्यांनी म्हटले.

# कराड उत्तरमध्ये पाटलांचा षटकार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सातारा :** कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील सलग सहाव्यांदा निवडून येत विजयाचा षटकार ठोकणार का, याची आगामी विधानसभा निवडणुकीत उत्सुकता असेल. विरोधी पक्षांकडून कोण उमेदवार असेल हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

लोकसभेला सातारा जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात तुल्यबळ लढत पाहायला मिळाली. सातारा मतदारसंघातून भाजपचे उदयनराजे भोसले विजयी झाले. सातारा जिल्ह्यातील फलटण आणि माण हे दोन विधानसभा मतदारसंघ माढा विधानसभा मतदारसंघात येतात. माढा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील विजयी झाले. सातारा जिल्ह्यात ८ विधानसभा मतदारसंघ आहेत. कराड उत्तर मतदारसंघ राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो.

मतदारसंघात कराड, सातारा, कोरेगाव आणि खटाव तालुक्यातील गावांचा समावेश होतो. मतदारसंघाची फेररचना होण्याअगोदरपासून बाळासाहेब पाटील या मतदारसंघाचे आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतरही ते शरद पवार यांच्यासोबत राहिले आहेत. २००९ च्या निवडणुकीत त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवत विजय मिळवला होता. अतुल भोसले यांना राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी दिली होती. पाटील यांनी १९९९ पासून आतापर्यंत झालेल्या विधानसभा निवडणुकीत आनंदराव पाटील, अरुण जाधव, अतुल भोसले आणि धैर्यशील कदम, मनोज घोरपडे यांचा पराभव केलेला आहे.

गेल्या निवडणुकीत भाजपने धैर्यशील कदम यांना उमेदवारी दिली होती. मनोज घोरपडे यांनी अपक्ष निवडणूक लढवली. बाळासाहेब पाटील यांच्या विरोधातील मतांचं विभाजन झालं आणि त्यांचा विजय सोपा झाला.

महायुतीच्या जागा वाटपात हा मतदारसंघ भाजपच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे. मनोज घोरपडे आणि धैर्यशील कदम यांच्यापैकी यावेळी कुणाला उमेदवारी मिळते हे पाहावे लागणार आहे.

# रश्मी बर्वे यांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** लोकसभा निवडणुकीच्या वेळी जात पडताळणी प्रकरणावरून चर्चेत आलेल्या काँग्रेसच्या नेत्या रश्मी बर्वे यांना सर्वोच्च न्यायालयाकडूनही मोठा दिलासा मिळाला आहे. महाविकास आघाडीकडून लोकसभेच्या रिंगणात उतरलेल्या आणि जात प्रमाणपत्र रद्द झाल्यामुळे उमेदवारी अर्जही बाद ठरलेल्या बर्वे यांचे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने अवैध ठरवले होते. परिणामी, रश्मी बर्वे यांचे रामटेक लोकसभेचा उमेदवारी अर्ज बाद झाला होता.

याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयातील याचिकेतून रश्मी बर्वेंनी निवडणूक लढवण्याची संधी मिळवावी, अशी मागणी केली होती. दरम्यान, उच्च न्यायालयाने समितीच्या निर्णयाला स्थगिती दिली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यासही नकार दिला होता. मात्र जात पडताळणी समितीने अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरवले होते. तो समितीचा निर्णय न्यायालयात रद्द केला असून रश्मी बर्वे यांना मोठा दिलासा दिला आहे.

रश्मी बर्वेंच्या जात पडताळणी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. बर्वे यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे.

# 5 ऑक्टोबरला नवी मुंबईत लँडिंग टेस्ट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** ५ ऑक्टोबरला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर विमानाची पहिली लँडिंग टेस्ट होणार आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती सिडकोचे चेअरमन आमदार संजय शिरसाट यांनी दिली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ रायगड जिल्ह्यात उलवा आणि पनवेल दरम्यान १६०० हेक्टरवर तयार होत आहे. त्यासाठी सिडको नोडेल एजन्सी म्हणून काम करत आहे. १९ हजार ६०० कोटी रुपये खर्च करुन हे विमानतळ उभारण्यात येत आहे. हा ग्रीनफील्ड एअरपोर्ट प्रॉजेक्ट ५ टप्प्यात पूर्ण होणार आहे.

# जरांगे पाटील यांची तब्येत पुन्हा खालावली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**संभाजीनगर :** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांची तब्येत पुन्हा खालावली. सकल मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करावा, सगेसोयरेसह कुणबी प्रमाणपत्र सरसकट मराठा समजाला द्यावे अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. फेब्रुवारी महिन्यात आश्वासन देऊनही शब्द न पाळल्याने जरांगे पाटील यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. दरम्यान, अंतरवाली सराटीत जरांगे पाटील यांची तब्येत घसरल्याने महिलांसह आबालवृद्ध भावुक झाले आहेत. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेण्यासाठी महिलांनी त्यांना विनंती केली. जरांगे पाटील यांनी पाणी प्यावे अशी विनंती करण्यात आली. यावेळी काही महिला मंचावर आल्या.

# हाके, वाघमारे यांची शिंदे, जरांगेंवर टीका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**जालना :** अंतरवाली सराटी आणि वडीगोद्रीत मराठा आणि ओबीसी आंदोलनाने वातावरण तापले आहे. दरम्यान, ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी ओबीसी नेत्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, छत्रपती संभाजीराजे आणि जरांगे पाटील यांच्यावर टीका केली.

वडीगोद्री येथे लक्ष्मण हाके म्हणाले की, आज सहावा दिवस आहे. एकही अधिकारी इकडे फिरकला नाही. मी राजरत्न आंबेडकर यांना ओळखत नाही. आम्ही प्रकाश आंबेडकर, आठवले यांना ओळखतो. संभाजी राजे छत्रपती यांना एकेरी भाषेत बोललो नाही. फक्त मी मिस्टर संभाजी भोसले म्हणालो. स्वराज्य संघटना आम्हाला काय गोळ्या घालणार आहे का? आम्ही कुठेही फिरतो, त्यांनी आम्हाला गोळ्या घालाव्या. अंतरवाली सराटीचा रस्ता आम्ही अडवला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी अडवला आहे. जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांना बोलावे.

मिस्टर जरांगे, तुम्ही ओबीसीमध्ये येऊन एक टक्क्यात काय काय घेणार आहात? मराठ्यांचे वाटोळे करू नका, अशी टीका त्यांनी केली. निवडणूक जिंकण्यासाठी शरद पवार यांना मुद्दा उरलेला नाही हे त्यांचे अपयश आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे हे मुद्दे उरले नाहीत. म्हणून जाती जातीत असे मुद्दे उतरून लोकात भ्रम तयार करत आहेत. धनगर आरक्षण जाहीर करा आणि मग आम्ही ओबीसीच्या आरक्षणाबद्दल निर्णय घेऊ. जरांगे आणि शरद पवार यांची तयारी आहे का? असा सवाल त्यांनी केला.

या राज्यात ओबीसीला इज्जत नाही. ओबीसीला धक्का कसा लागणार नाही एकदा सरकारने आम्हाला सांगावे, चर्चा करायला आम्ही तयार आहोत. निवडणूक जवळ आल्याने सगळे नेते दबावाला बळी पडले की काय ?त्यामुळे ओबीसी नेते इथे आले तरी ठीक नाही आले तरी ठीक, अशी टीका नवनाथ वाघमारे यांनी केली.

## एसटी महामंडळ फेरीसाठी अतिरिक्त उत्पन्नाचे देणार बक्षीस

# चालक-वाहकांना प्रोत्साहन भत्ता त्याच दिवशी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एसटी महामंडळ प्रत्येक फेरीचे उत्पन्नाचे उद्दिष्ट देऊन ते उद्दिष्ट पूर्ण करुन अतिरिक्त उत्पन्न आणणाऱ्या चालक आणि वाहकांना उद्दिष्टांपेक्षा वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दोघांना सम प्रमाणात वाटणार आहे. सदर रक्कम त्यांची कामगिरी संपवून आगारात आल्यानंतर त्याच दिवशी रोख स्वरूपात मिळणार आहे.

उत्पन्न वाढविण्यासाठी जास्तीत जास्त उत्पन्न आणणाऱ्या चालक आणि वाहक यांना एसटीतर्फे रोख प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळाने आपले उत्पन्न वाढावे म्हणून विविध उपयोजना आणि अभिनव उपक्रम हाती घेतले आहेत.

प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन यासारखे उपक्रम राबवून प्रवाशांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच प्रत्यक्ष प्रवासात प्रवाशांना अडचण आल्यास आगार प्रमुखांचे दूरध्वनी क्रमांक प्रत्येक बसमध्ये प्रदर्शित करण्यात आले आहेत.




### अवैध मार्गाचा वापर नको

● विशेष म्हणजे, प्रवासी तक्रार, प्रवाशांशी केलेली गैरवर्तणुक अथवा उत्पन्न वाढीसाठी अवैध मार्गाचा वापर केल्यास संबंधित चालक-वाहक यांना प्रोत्साहन भत्ता मिळणार नाही, असेही महामंडळाने स्पष्ट केले आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळाल्यास ही योजना पुढे चालू ठेवण्याबाबतही निर्णय घेण्यात येईल.

याबरोबरच तोट्यातील आगारांना मार्गदर्शन करण्यासाठी पालक अधिकारी नियुक्त केले आहेत. इंधन बचतीसाठी चालक आणि यांत्रिक कर्मचारी यांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन पासचे वितरण करण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे एसटी महामंडळाने ऑगस्ट २०२४ या महिन्यात १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये नफा मिळवला आहे. उत्पन्न वाढीत सातत्य राहण्यासाठी चालक-वाहक हा घटक अत्यंत महत्त्वाचा असून त्यांची कामगिरी चांगली व्हावी, त्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रायोगिक तत्त्वावर एक महिन्यासाठी वाढीव उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता योजना महामंडळाने सुरू केली आहे.







# वार्धक्य रोखायचंय?

वार्धक्य रोखण्याबाबत सतत नवनवे संशोधन होत असते. आहारातील बदलही यासाठी उपयुक्त ठरत असतात. कमी कर्बोदके व कमी उष्मांक असलेला आहार हा वार्धक्याच्या प्रक्रियेचा वेग कमी करतो. कारण त्यात विशिष्ट प्रकारचे संयुग असते, असे वैज्ञानिकांचे मत आहे. ग्लॅडस्टोन प्रयोगशाळेतील संशोधक एरिक वेर्दिन यांनी सांगितले की, मानवी शरीरातील एक संयुग हे वार्धक्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडत असते.

वयाशी निगडित असलेले हृदयरोग, अल्झायमर व कर्करोगाचे काही प्रकार हे आजार रोखण्यासाठी त्यामुळे नवीन औषधे तयार करता येऊ शकतात. बिटा हायड्रॉक्सिब्युटायरेट (बिटा–ओएचबी) या संयुगाची भूमिका वैज्ञानिकांनी तपासली असून ते आपल्या शरीरातील एक केटोन आहे. त्याची निर्मिती प्रदीर्घ काळ कमी उष्मांकाचा आहार किंवा केटोजेनिक आहारामुळे या संयुगाची निर्मिती मानवी शरीरात होत असते. केटोन गटातील संयुगे ही काही वेळा अतिमात्रेत असतील तर विषारीही सिद्ध होत असतात ती टाईप १ मधुमेह असलेल्या रुग्णाच्या शरीरात ती आढळतात. ऑक्सिडीकरणामुळे येणारा ताण हा काही रेणू विषारी पातळीपर्यंत वाढल्याने निर्माण होतो, त्यामुळे वार्धक्याची क्रिया वाढत जाते. बिटा–ओएचबी हा शरीरातील ऊर्जेचा प्रमुख स्रोत काही विकारांना रोखतो जी ऑक्सिडेशनमुळे ताण निर्माण करीत असतात. ताण रोखल्याने यात पेशींपासूनच वार्धक्याची क्रिया रोखली जाते. पेशी जेव्हा ऊर्जेसाठी ऑक्सिजन वापरतात तेव्हा ऑक्सिडीकरणाने ताण येतो व परिमाम शरीरात विषारी रेणू सोडले जातात त्यांनाच आपण फ्री रॅडिकल्स किंवा मुक्त कण असे म्हणतो. पेशी वार्धक्याकडे झुकतात तसे मुक्त कणांची निर्मिती रोखण्याची त्यांची क्षमता कमी होत जाते. पेशी खराब होतात. ऑक्सिडेशनमुळे ताण वाढतो व वार्धक्य आणखी वेगाने तुमचा पाठलाग करते. बिटा–ओएचबीमुळे या प्रक्रियेला अटकाव होतो. वैज्ञानिकांच्या मते बिटा–ओएचबी निर्मितीमुळे हिस्टोन डिॲसेटिलाइजेस किंवा एचडीएसी या वितंचकाचे कार्य रोखले जाते. एचडीएसीमुळे फॉक्सो ३ ए व एमटी २ या जनुकांची जोडी स्वीच ऑफ केली जाते पण बिटा–ओएचबीमुळे एचडीएसीला तसे करण्यापासून रोखले जाते परिणामी ही दोन्ही जनुके कार्यान्वित राहतात त्याचा परिणाम म्हणून पेशी ऑक्सिडेशनने निर्माण होणाऱ्या चाणाला रोखण्याची प्रक्रिया सुरू करतात. ◆◆◆

# ब्रह्मांडातील सर्वात जुना तारा


ब्रह्मांडातील आतापर्यंतचा सर्वात जुना तारा ऑस्ट्रेलियाच्या वैज्ञानिकांनी शोधला असून तो महाविस्फोटानंतर अर्थात बिग बँग नंतर काही काळातच म्हणजे १३.७ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेला आहे. हा तारा पृथ्वीपासून ६००० प्रकाशवर्षे दूर असून त्यामुळे वैज्ञानिकांना प्राथमिक ताऱ्यांची रासायनिक रचना अभ्यासण्याची संधी मिळाली आहे, तसेच विश्वाचे बालपण कसे होते यावरही प्रकाश पडणार आहे. द ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी रीसर्च स्कूल ऑफ ॲस्ट्रॉनॉमी ॲंड ॲस्ट्रोफिजिक्स या संस्थेचे प्रमुख संशोधक स्टीफन केलर यांनी सांगितले की, पहिल्या ताऱ्याची रासायनिक रचना आता आम्हाला सापडली आहे व तो ताराही सापडला आहे.



विश्वाच्या निर्मितीनंतर पहिले तारे कसे होते याची कल्पनाही त्यातून येईल. एएनयू स्कायमॅपर या सायडिंग स्प्रिंग ऑब्झर्वेटरीच्या मदतीने हा तारा शोधून काढण्यात आला असून पाच वर्षांच्या प्रकल्पात दक्षिण आकाशाचा नकाशा तयार करण्यात आला व त्यात प्राचीन तारे शोधण्याचा हेतू होता. गवताच्या गंजीत सुई शोधण्याचा हा प्रकार केवळ या दुर्बिणीच्या मदतीने शक्य झाला, असेही केलर म्हणाले. केलर व त्यांच्या सहकाऱ्यांनी या ताऱ्याच्या शोधाची खातरजमा चिली येथील मॅगेलान दुर्बिणीच्या मदतीनेही केली आहे. या नवीन ताऱ्याची रासायनिक रचना वेगळी असून, त्याचे वस्तुमान सूर्याच्या ६० पट आहे. आपल्या सूर्यासारखा तारा तयार होण्यासाठी हायड्रोजन व हेलियम यांची गरज असते. महाविस्फोटातून ती पूर्ण झाली व त्यात काही प्रमाणात लोह मिसळले गेले. त्याचे प्रमाण पृथ्वीच्या वस्तुमानाच्या एक हजार पट असते. आता जो प्राचीन तारा सापडला आहे, त्यात ऑस्ट्रेलियाच्या आकाराच्या लघुग्रहाइतके लोह असावे व कार्बनही असावा. त्यामुळे पहिले तारे कसे होते व त्यांचा मृत्यू कसा होत असे यावर त्यामुळे प्रकाश पडणार आहे. विश्व निर्मितीच्या सुरुवातीला निर्माण झालेल्या ताऱ्यांचा मोठ्या विस्फोटांनी मृत्यू होतो व त्यामुळे अवकाशात लोहाचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात पसरते, असा आतापर्यंतचा समज होता. पण तो खोटा ठरला आहे. आता सापडलेल्या प्राचीन ताऱ्याच्या निरीक्षणावरून त्या ताऱ्यांच्या मृत्यूनंतर निर्माण होणाऱ्या प्रदूषणात कार्बन व मॅग्नेशियम या हलक्या मूलद्रव्यांचा समावेश आहे.
याचाच अर्थ त्या वेळी ताऱ्यांच्या स्फोटात कमी ऊर्जा बाहेर पडत होती व लोहासारखी जड मूलद्रव्ये ही कृष्णविवरे गिळंकृत करीत असत. ही कृष्णविवरे स्फोटाच्या केंद्रस्थानी तयार होत असत, असे केलर यांनी सांगितले. जर्नल नेचर या नियत कालिकात हा शोधनिबंध प्रसिद्ध झालेला आहे. ◆◆◆

# कृत्रिम अस्थिमज्जेची निर्मिती

स्टेमसेल्स म्हणजेच मूळपेशी किंवा स्कंदपेशी या अशा पेशी असतात ज्यांचे रूपांतर कोणत्याही अवयवाच्या पेशींमध्ये करता येऊ शकते. जर्मन वैज्ञानिकांनी कृत्रिम अस्थिमज्जेची निर्मिती केली असून त्याच्या मदतीने अशा मूळपेशींची संख्या वाढवता येते. परिणामी त्याचा उपयोग रक्ताचा कर्करोग (ल्यूकेमिया) बरा करण्यासाठी होऊ शकतो. ही कृत्रिम अस्थिमज्जा म्हणजे एक सच्छिद्र घटक असून त्यात नैसर्गिक अस्थिमज्जेचे (मगज) गुणधर्म आहेत व त्याचा वापर प्रयोगशाळेत मूळपेशी वाढवण्यासाठी करता येणार आहे. संशोधकांच्या मते कालांतराने रक्ताचा कर्करोग बरा करण्यासाठी या कृत्रिम अस्थिमज्जेचा उपयोग होईल.




कार्लश्रु हे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅक्स प्लांक इन्स्टिट्यूट फॉर इंटेलिजंट सिस्टीम्स, स्टुटगार्ट व तुबीगेन युनिव्हर्सिटी या तीन संस्थांनी या कृत्रिम अस्थिमज्जेची निर्मिती केली असून त्यात मूळपेशींची संख्या वाढत जाते. एरिथ्रोसाईटस्? किंवा प्रतिरक्षा पेशी सारख्या रक्तातील पेशींचा पुरवाठा हेमाटोपोइटिक मूळ पेशींकडून केला जात असतो व हेमाटोपोइटिक मूळ पेशी अस्थिमज्जेत तयार होत असतात. त्यांचे कार्य बिघडले तर रक्त विकार होतात.

हेमाटोपोइटिक मूळ पेशी या रक्ताच्या कर्करोगावर उपचारासाठी वापरता येऊ शकतात. रक्ताचा कर्करोग झालेल्या व्यक्तीत बाधित पेशींच्या जागी आरोग्यवान व्यक्तीच्या हेमाटोपोइटिक मूळ पेशी वापरल्या जातात. अर्थात त्यासाठी योग्य दाता मिळणे आवश्यक असते. सध्या तरी या पेशी त्यांच्या नैसर्गिक पर्यावरणात त्यांचे गुणधर्म पाळतात. या प्रश्नावर उत्तर म्हणून वैज्ञानिकांनी नैसर्गिक अस्थिमज्जेचे गुणधर्म प्रयोगशाळेत निर्माण करता येतात. कृत्रिम बहुलक तयार करणाऱ्या वैज्ञानिकांनी हाडाच्या आकारासारखी स्पंजासारखी एक रचना तयार केली त्यात रक्तनिर्मिती करणाऱ्या अस्थिमज्जेची नक्कल केलेली आहे. त्यांनी त्यासाठी अस्थिमज्जेत असतात तसेच मॅट्रिक्स प्रथिनांच्या मदतीने तयार केले. नाळेच्या रक्तातील मूळ पेशी या कृत्रिम अस्थिमज्जेत आणल्या असतात. त्यांची संख्या काही दिवसात वाढल्याचे दिसून आले. याचाच अर्थ कृत्रिम अस्थिमज्जेत मूळ पेशींची पुनर्निर्मिती झाली. ●●●

# जगावेगळ्या चोराची कहाणी

अनेक चोरीच्या घटना आपण ऐकल्या असतील. कोणी बँक लुटली, कोणी एटीएम फोडले, घरातील तिजोरीतून सगळे दागिने लंपास केले. यांसारख्या अनेक घटनांचा सर्वसाधारणपणे यात समावेश असतो; पण असाही चोर असू शकतो का, जो घरात घुसतो, जेवून घेतो, साफसफाई करतो अन् चोरी न करताच पसारही होतो? थोडेसे आश्चर्य वाटेल; पण अमेरिकेत असाच काहीसा अजब किस्सा घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही अमेरिकेच्या वॉशिंगटनमध्ये घडली आहे. येथे एका चोराने असे काही केले आहे की, ते पाहून अनेक जण हैराण झाले आहेत. हा चोर कोणत्याही प्रकारची चोरी करत नाही, तर चक्क लोकांच्या घरात जाऊन राहतो. घराची साफसफाई करतो. टिव्ही बघतो, जेवण बनवून खातो. विशेष म्हणजे जेवल्यानंतर तो भांडी देखील धुऊन ठेवतो. आश्चर्याची बाब म्हणजे हा चोर घरातील काहीही चीजवस्तू लंपास; मात्र करत नाही.

व्यक्तीचे विचित्र वर्तन मिळालेल्या माहितीनुसार एका व्यक्तीने सांगितले की, चोराने किचनची खिडकी तोडून घरात प्रवेश केला. त्याने स्वयंपाकघर वापरले आणि स्वतः साठी स्वयंपाक केला. भांडी साफ करून अंघोळ केली. एवढेच नाही, तर विखुरलेले कपडे व्यवस्थित करून ठेवले. यानंतर तो माणूस काहीही न चोरता तेथून पळून गेला. जाण्यापूर्वी त्याने एक चिठ्ठी टाकली. जी चिठ्ठी वाचून घराचा मालकही हैराण झाला. मी सकाळी घरी पोहोचलो तेव्हा स्वयंपाकघरात एक चिठ्ठी पडलेली दिसली. त्या चिठ्ठीत लिहिले होते, मला अन्नाची नितांत गरज होती. मी तुमच्या घरात शिरलो. जेवलो, अंघोळ केली, मला माफ करा. मालकाने पुढे सांगितले की, मनोरंजक गोष्ट म्हणजे त्याने भांडीदेखील धुतलेली होती, त्यामुळे मला वाटते की, तो एक चांगला बदमाश होता. इतकंच नाही, तर रात्री झोपून त्याने ब्लॅकेटची घडी घालूनदेखील ठेवली होती. मी ती चिठ्ठी वाचल्यावर काय करू ते कळत नव्हते. पोलिसांना याबद्दल कळवायचे का, कळवायचे तर त्यांना काय सांगायचे, हादेखील माझ्यासमोर एक प्रश्नच आहे, असे या घरमालकाने म्हटले आहे. ●●●



# उडत्या तबकड्यांचे गूढ उकलणार?




अमेरिकेमध्ये सध्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. या वेळेस डोनाल्ड ट्रम्प विरुद्ध कमला हॅरिस अशी लढत पाहायला मिळणार असून दोन्ही उमेदवार सध्या मुलाखती देताना दिसत आहेत. एका मुलाखतीत त्यांनी म्हटले की, आपण राष्ट्राध्यक्षपदी निवडून आलो तर 'युफो' म्हणजेच उडत्या तबकड्यांचे व्हिडीओ सार्वजनिक करण्याच्या धोरणास पाठिंबा देऊ!

ट्रम्प हे सोशल मीडियावर लोकप्रिय असलेल्या लोकांना मुलाखती देत आहेत. त्यांनी काही आठवड्यांपूर्वी जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि एक्सचे (आधीचं ट्विटर) प्रमुख एलन मस्क यांना मुलाखत दिली. नुकतीच त्यांनी पॉडकास्टर लेक्स फ्रिडमॅनला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीबद्दल चर्चा केली. अनेक वादग्रस्त आणि अगदीच वेगळ्या विषयांवर या मुलाखतीत त्यांनी आपली मते व्यक्त केली. या मुलाखतीत उडत्या तबकड्या म्हणजेच युएफओसंदर्भातही चर्चा झाली. युएफओ म्हणजेच परग्रहवासियांची वाहनं म्हणून समजल्या जाणाऱ्या उडत्या तबकड्यांबद्दल अमेरिकेबरोबरच जगभरामध्ये कुतूहल कायमच राहिलं आहे. असं असतानाच आता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या व्यक्तीने याबद्दल बोलल्याने पुन्हा या विषयाची चर्चा होताना दिसत आहे. भविष्यात अमेरिकेमधील संरक्षण दलाचं प्रमुख कार्यालय असलेल्या पेंटागॉनच्या माध्यमातून या उडत्या तबकड्यांचे व्हिडीओ सार्वजनिकरीत्या जारी करण्याच्या धोरणाला माझा पाठिंबा असेल, असं ट्रम्प म्हणाले. पेंटागॉनला सांगून तुम्ही यूएफओचे यापूर्वी न पाहिलेले आणि अधिक फुटेज जारी करायला सांगण्याची शक्यता आहे का, असं विचारलं. यावर उत्तर देताना ट्रम्प यांनी, 'मी नक्कीच हे करेन. मला हे करायला आवडेल. खरं तर मला हे केलं पाहिजे', असं उत्तर दिलं. त्यामुळेच ट्रम्प सत्तेत आल्यानंतर यापूर्वी कधीही सर्वसामान्यांपर्यंत न पोहोचलेली रंजक माहिती समोर येण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. ◆◆◆

# स्नायू बळकटीसाठी खा हेझलनटस्



निरोगी राहण्यासाठी तज्ज्ञ सुकामेवा खाण्याचा सल्ला देतात. अनेक जण आहारात ड्रायफ्रूटस्चा समावेश करतात. पण, खूप कमी लोकांना माहिती आहे की एक ड्रायफ्रूट जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ते म्हणजे हेझलनट किंवा पहाडी बदाम. त्याला कुल्ठी किंवा चिलगोजा म्हणून देखील ओळखले जाते. याला काजू आणि बदामांपेक्षाही जास्त शक्तिशाली मानले जाते. विशेषतः जेव्हा शरीराला शक्ती आणि पोषण देण्याची गरज असते, त्यावेळी त्याचे सेवन अतिशय लाभदायक ठरते. शरीराच्या स्नायूंना बळकट करण्यासाठी, हाडांमध्ये लोहाची कमतरता भरून काढण्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी हे फायदेशीर आहे. हेझलनट्सच्या सेवनाने शरीराला अनेक फायदे मिळतात. पहाडी बदामामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने आढळतात. जे आपल्या स्नायूंना बळकट करू शकतात. कमकुवत बरगड्यांना मांस पुरवण्यास देखील ते मदत करतात. याच्या सेवनाने ताकद तर मिळतेच; पण कमी वजनाचे लोक देखील वजन वाढवू शकतात. ज्यांना कमकुवत स्नायूंचा त्रास आहे त्यांच्यासाठी हे उपयुक्त आहे. हा लोहाचा उत्कृष्ट स्रोत आहे, ज्याच्या सेवनाने तुमचा स्नायू बळकट करणारा हा आरोग्यदायी सुकामेवा अशक्तपणा दूर होतो. लोहाच्या कमतरतेमुळे ॲनिमियासारख्या समस्या देखील दूर होतात. लोहाच्या पुरवठ्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि हाडे मजबूत होण्यास मदत होते. त्यात ओमेगा – ३ फॅटी ॲसिड आढळते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी ते मदत करतात. हेझलनट्समध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते. जे हाडे मजबूत करतात. हाडे नैसर्गिकरित्या निरोगी ठेवण्यासाठी हा एक उत्तम स्रोत आहे. त्यामुळे त्याचा आहारात समावेश केला पाहिजे. शरीराला ऊर्जा देतात. त्यामुळे अशक्तपणा आणि थकवा टाळता येतो. हेझलनट स्नायूंना मजबूत तर करतातच आणि लोहाच्या कमतरतेवर मात करण्यास मदत करतात. यामुळे हाडांचे आरोग्य देखील सुधारतात. काजू आणि बदामांपेक्षाही अधिक शक्तिशाली आणि पौष्टिक आहे. ◆◆◆



# ओझोनचे नवे शत्रू

सूर्याच्या हानिकारक किरणांपासून पृथ्वीचे व पर्यायाने जीवसृष्टीचे रक्षण करण्यात पृथ्वीभोवतीचा ओझोनचा स्तर महत्त्वाचे योगदान देत असतो. वातावरणातील या ओझोनचा ऱ्हास करणारे आणखी चार वायू सापडलेले असून, गेल्या ५० वर्षांत मानवी कृतींमुळेच ते वातावरणात गेले आहेत. बंदी घालण्यात आलेल्या संयुगांच्या वापरामुळे वायू वातावरणात मिसळून ओझोनच्या थराचा ऱ्हास झाला आहे, असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे.



१९९० मध्ये पृथ्वीच्या स्ट्रॅटोस्फिअरमध्ये असलेल्या ओझोनच्या थराची हानी करणारे हे वायू सोडले गेले; पण ते आता सापडले आहेत. युरोप व ऑस्ट्रेलियातील पथकाने याबाबत केलेले संशोधन नेचर जिओसायन्स या नियतकालिकात प्रसिद्ध झालेले असून, त्यांनी म्हटले आहे की, आम्ही असे नऊ वायू शोधून काढले आहेत, जे १९६० च्या सुमारास पृथ्वीच्या वातावरणात नव्हते व ते मानवनिर्मित आहेत. वैज्ञानिकांनी त्यासाठी प्रदूषित नसलेल्या टास्मानिया येथे हवेचे नमुने घेतले व ग्रीनलँडमधील बर्फाचे नमुने घेतले. या चार नवीन वायूंची ओळख पटवताना त्याचा उपयोग झाला, हे चारही वायू ओझोनच्या थराचा ऱ्हास करीत आहेत. हे नवीन वायू कुठून उत्सर्जित होत आहेत हे समजलेले नाही; पण ते शोधून काढले जातील. यातील तीन वायू हे क्लोरोफ्लुरोकार्बन गटातील आहेत तर चौथा हायड्रो फ्लुरोकार्बन गटातील आहे. क्लोरोफ्लुरोकार्बन हे वातानुकूलन, शीतकरण, स्प्रे कॅन यासाठी वापरले जातात. हायड्रो फ्लुरोकार्बन हे त्यानंतर आलेले घटक आहेत. नव्याने शोधलेल्या चार वायूंचे वातावरणातील प्रमाण काही वर्षांपूर्वी ७४००० टन होते. ●●●

# येतोय झेटा-क्लास सुपरकॉम्प्युटर



सध्याच्या सर्वात वेगवान सुपर कॉम्प्युटर्सना मागे टाकणारा पहिला झेटा–क्लास सुपरकॉम्प्युटर बनवण्याची तयारी जपानने केली आहे. पुढील वर्षांपासून हा सुपरकॉम्प्युटर वनवण्याचे काम सुरू होईल आणि २०३० पर्यंत हा सुपरकॉम्प्युटर सुरू होईल. हा सुपरकॉम्प्युटर बनवण्यासाठी ७५० दशलक्ष डॉलर्सपेक्षाही अधिक खर्च येणार आहे.

हा सुपरकॉम्प्युटर ज्यावेळी पूर्णपणे संचालित होईल, त्यावेळी तो सध्याच्या सर्वात वेगवान सुपर कॉम्प्युटर्सपेक्षा एक हजार पट अधिक वेगाने काम करील. हा सुपरकॉम्प्युटर २०३० पर्यंत पूर्णपणे ऑनलाईन होईल आणि त्याचा लाभ जपानला आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयच्या विकासाची गती वाढवण्यासाठी होईल. जपानच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने या नव्या मशिनची योजना सर्वप्रथम २८ ऑगस्टला जाहीर केली होती. मंत्रालयाने म्हटले आहे की झेटाफ्लॉप्स स्केल वर ता सुपरकॉम्प्युटरचा वेग पोहोचेल. इतका वेग यापूर्वी कधीही गाठलेला नाही. फ्लॉप्स म्हणजे फ्लोटिंग पॉईंट ऑपरेशन्स परसेकंड. एखादा कॉम्प्युटर गणितीय आकडेमोड किती वेगाने सोडवतो हे पाहण्यासाठीचे हे मोजमाप आहे. त्यामध्ये एक फ्लोटिंग–पॉईंट ऑपरेशन म्हणजे सिंगल कॅल्क्युलेशन असते. १ झेटाफ्लॉप्सचा वेग असलेला एखादा सुपरकॉम्प्युटर प्रत्येक सेकंदाला वन सेक्स्टीलियन म्हणजेच एकावर २१ शून्ये इतकी गणितीय आकडेमोड करू शकतो. सध्याच्या सुपरकॉम्प्युटरने एक्झाफ्लॉप्सचीच सीमा ओलांडलेली आहे. याचा अर्थ तो प्रत्येक सेकंदाला एकावर १८ शून्ये इतक्या गणितीय आकडेमोड करू शकतो. ●●●

## इस्रायलने पुकारले लेबनॉनविरोधात युद्ध

# मध्य पूर्वेत तणाव वाढला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**तेल अवीव :** लेबनॉनमध्ये पेजर आणि वॉकीटॉकीचा स्फोट घडवून आणल्यानंतर, इस्रायलने आता लेबनॉनमध्ये सक्रिय असलेल्या हिजबुल्लाहविरोधात थेट युद्ध छेडले आहे. इस्रायलने लेबनॉनवर १६०० हल्ले केले असून, गेल्या १८ वर्षांतील हा सर्वात भीषण हल्ला ठरला. यात सुमारे ५०० नागरिकांचा मृत्यू झाला. आता या भागातील तणाव शिगेला पोहोचला आहे. अमेरिकेने मध्यपूर्वेत अधिक सैन्य तैनात करणार असल्याचे जाहीर केले असतानाच, चीनने लेबनॉनला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. लेबनॉनचे सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी चीन लेबनॉनला खंबीरपणे पाठिंबा देतो, असे चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी लेबनॉनचे परराष्ट्रमंत्री अब्दुल्ला बू हबीब यांना सांगितले.



दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी लेबनॉनच्या जनतेला संबोधित करताना म्हटले आहे की, तुम्ही लोकांनी सुरक्षित ठिकाणी जावे. लेबनॉनच्या जनतेशी आमचे कोणतेही वैर नाही, पण हिजबुल्लाहला इस्रायल सोडणार नाही. इस्रायलच्या या हल्ल्यांमुळे मध्य पूर्वेतील परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. अमेरिकेने अतिरिक्त सैन्य पाठवण्याची घोषणा केली आहे, तर इराणने त्याचे परिणाम भोगण्याची धमकी दिली आहे. हिजबुल्लाहकडून इस्रायलवर सुमारे २०० रॉकेट डागण्यात आले असून, इस्रायलने ७ दिवसांची आणीबाणी जाहीर केली आहे. इस्रायलने आपली आयर्न डोम यंत्रणा देखील सक्रिय केली आहे.


लेबनॉनसाठी २३ सप्टेंबर हा सर्वात घातक दिवस ठरला. यापूर्वी २००६ मध्ये त्यांना अशा हल्ल्यांना सामोरे जावे लागले होते. इस्रायली लष्कराने हिजबुल्लाहविरोधात मोठ्या प्रमाणात हवाई मोहीम सुरू करण्यापूर्वी दक्षिण आणि पूर्व लेबेनॉनमधील रहिवाशांना घरे रिकामी करण्याचा इशारा दिला आहे. इस्रायलच्या इशाऱ्यानंतर हजारो लेबनानींनी आपली घरे सोडली. २००६ च्या इस्रायल-हिजबुल्ला युद्धानंतरचे हे सर्वात मोठे स्थलांतर ठरले आहे. लेबनॉनमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यांमुळे इराणलाही आश्चर्याचा धक्का बसला आहे. अमेरिकेने मध्यपूर्वेत अतिरिक्त सैन्य पाठवण्याचा घेतलेल्या निर्णयाने, मध्य पूर्वेतील युद्ध आणखी चिघळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

इन्फोग्राफिक्स

## मोदी-झेलेन्स्की यांची तीन महिन्यांत तिसऱ्यांदा भेट

आंतरराष्ट्रीय

**पंतप्रधान नरेंद्र मोदी** यांनी आपल्या तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी न्यूयॉर्कमध्ये युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांची भेट घेतली. पंतप्रधान मोदी आणि झेलेन्स्की यांच्यात तीन महिन्यांतील ही तिसरी बैठक आहे. महिनाभरापूर्वी पंतप्रधान मोदींनी युक्रेनला भेट देऊन झेलेन्स्की यांची भेट घेतली होती. युक्रेनच्या विनंतीवरून ही बैठक घेण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. दोन्ही नेत्यांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाली. पंतप्रधान मोदींनी झेलेंस्की यांना भेटतानाचे फोटोही सोशल मीडियावर प्रसिद्ध केले. झेलेन्स्की यांची भेट घेतल्यानंतर युक्रेनमधील संघर्ष लवकरात लवकर सोडविण्यासाठी तसेच प्रदेशात शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी भारताच्या पाठिंब्याचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. त्याचवेळी झेलेन्स्की यांनी त्यांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी आपला तीन दिवसांचा अमेरिका दौरा आटोपून दिल्लीला रवाना झाले. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर देखील द्विपक्षीय बैठकीला उपस्थित होते. झेलेन्स्की यांनी युक्रेन संघर्षाकडे भारताचे लक्ष आणि शांतता आणण्यासाठी पंतप्रधान मोदीयांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. पंतप्रधान मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी झालेल्या भेटीत आपण नेहमीच शांततेच्या बाजूने असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, त्यांनी अनेक जागतिक नेत्यांशी चर्चा केली असून, या नेत्यांनी युद्धावर लवकरात लवकर तोडगा निघून ते संपले पाहिजे, यावर सहमती दर्शविली आहे.



» Selected

## निफ्टीचा नवा उच्चांक

**मुंबई :** निफ्टीने पहिल्यांदाच २६,००० चा टप्पा ओलांडल्यानंतर मंगळवारी अस्थिर सत्रात भारतीय शेअर निर्देशांक सपाट बंद झाले. निर्देशांक १४.५७ अंकांनी वधारून ८४,९१४.०४ वर, तर निफ्टी १.४० अंकांनी वधारून २५,९४०.४० वर बंद झाला. सुमारे १,८७१ समभाग वधारले, १,९४६ घसरले आणि ८४ अपरिवर्तित राहिले. टाटा स्टील, हिंडाल्को इंडस्ट्रीज, पॉवर ग्रिड कॉर्प, टेक महिंद्रा आणि अदानी एंटरप्रायझेस यांचे समभाग सर्वाधिक वधारले, तर एसबीआय लाइफ इन्शुरन्स, एचयूएल, ग्रासिम इंडस्ट्रीज, अल्ट्राटेक सिमेंट आणि श्रीराम फायनान्स यांचे समभाग घसरले. क्षेत्रवार आघाडीवर धातू निर्देशांक ३ टक्के, तेल व वायू निर्देशांक ०.६ टक्के, ऊर्जा निर्देशांक १.४ टक्क्यांनी वधारले. दुसरीकडे पीएसयू बँक, एफएमसीजी आणि टेलिकॉम ०.५-१ टक्क्यांनी घसरले. बीएसईमिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक घसरणीसह बंद झाले.

## कोलकाता प्रकरणी दावा

**कोलकाता :** आरजी कर वैद्यकीय महाविद्यालयातील बलात्कार हत्याप्रकरणी भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी स्फोटक दावा केला आहे. तृणमूल काँग्रेसचा एक नेता पीडितेचा तोतया काका बनून पीडितेच्या मृतदेहाच्या विच्छेदनावेळी आल्याची माहिती सुवेंदू यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी विच्छेदनावेळी घाई केली, असा दावा सुवेंदू यांनी केला आहे. सीबीआय चौकशीच्या प्रकरणातून समोर आलेल्या डॉक्टरांचा हवाला देत सुवेंदूंनी ही माहिती दिली. सुवेंदूंनी ट्विट करत यामागील दडलेली माहिती सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणाले की, पीडितेचा काका असल्याचा दावा करणारा एक व्यक्ती होती. ही व्यक्ती तृणमूल काँग्रेसचा नेता आहे. त्यानेच पीडितेच्या अंत्यसंस्कारावेळी घाई केली, असा आरोप सुवेंदू यांनी केला. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडून त्यासाठी निर्देश देण्यात आले होते, असा आरोपही त्यांनी केला आहे.

## तिरुमला प्रसाद भेसळ; अहवालावर प्रश्नचिन्ह

# कंपनीने आरोप नाकारला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**विजयवाडा :** तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) ने श्री वेंकटेश्वर मंदिराला भेसळयुक्त तूप पुरविल्याप्रकरणी तामिळनाडूतील एआर डेअरी फूड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीवर कायदेशीर कारवाई सुरू केल्यानंतर कंपनीने हा निर्णय कोणत्या अहवालावर आधारित होता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

डिंडीगुल येथील एआर डेअरी फूडचे गुणवत्ता नियंत्रण अधिकारी कन्नन यांनी माध्यमांशी बोलताना दिलेल्या भेसळ झाल्याचा आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. टीटीडीच्या कार्यकारी अधिकारी जे. श्यामला राव यांनी एआर डेअरीच्या तुपाचे नमुने अत्यंत भेसळयुक्त आढळल्याची घोषणा केली होती. कन्नन म्हणाले, आम्ही १९९८



पासून कार्यरत असून, आमच्यावर अशा प्रकारचे आरोप होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

एआर डेअरी स्वत:ची खरेदी केंद्रे चालवते आणि ३२ सेकंदात दुधाच्या १०२ गुणवत्तेचे मापदंड तपासण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करते. दूध गुणवत्ता चाचणीत नापास झाल्यास ते तत्काळ नाकारले जाते.टीटीडीला तूप पुरवठा करण्यासाठी एआर डेअरीला मान्यता देण्यात आली होती, मंदिर प्रशासनाच्या चार सदस्यीय तज्ज्ञ पथकाने त्यांच्या कारखान्याला भेट देऊन त्यांची क्षमता आणि गुणवत्ता नियंत्रण उपाययोजनांचा आढावा घेतला.

टीटीडीला पाठवण्यापूर्वी आमच्या तुपाचे नमुने प्रथम राष्ट्रीय प्रयोगशाळेत तपासले जातात. तिथे आल्यावर टीटीडीचे स्वत:चे अन्न सुरक्षा अधिकारी पुन्हा नमुन्यांची तपासणी करतात, असे कन्नन यांनी सांगितले. कन्नन यांच्या मते, एआर डेअरीआयएसओ प्रमाणपत्र धारण करते आणि कठोर गुणवत्तेच्या प्रोटोकॉलचे पालन करते. मागील कोणत्याही अहवालात गुणवत्तेत कोणताही विचलन दिसून आलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. एआर डेअरीने पुरवलेल्या तुपाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती टीटीडीचे अधिकारी जे. श्यामला राव यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच या तुपाच्या १० टँकरपैकी चार टँकरमध्ये अत्यंत भेसळ असल्याचे आढळून आल्याचे राव यांनी सांगितले.

## सिद्धरामय्या यांची याचिका फेटाळली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पदाचा गैरवापर करत पत्नीला दिलेल्या भूखंडावरून त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल करण्यासाठी राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी दिलेल्या परवानगीविरोधात सिद्धरामय्या यांनी दाखल केलेली याचिका कर्नाटक उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांनी सिद्धरामय्या यांच्याविरोधात खटले दाखल करण्यास मंजुरी देण्याच्या राज्यपालांच्या १६ ऑगस्टचा आदेश कायम ठेवला. न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना म्हणाले की, या प्रकरणातील तथ्यांची चौकशी होणे आवश्यक आहे २०२१ मध्ये जमीन देण्यात आलेली आहे. चौकशीतूनच यात भ्रष्टाचार झाला की नाही, हे उघड होऊ शकते, असेही त्यांनी म्हटले आहे.

# परतीच्या पावसाला जोरदार सुरुवात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नैर्ऋत्य मोसमी वाऱ्याने परतीचा प्रवास सुरू केला असून, पश्चिम राजस्थान आणि कच्छमधून हा परतीचा प्रवास होत आहे. यंदाच्या मान्सूनमुळे देशात पाच टक्के अधिक पाऊस झाला आहे. येत्या आठवड्यातही देशाच्या अनेक भागात पाऊस पडेल, असे हवामान खात्याचे म्हणणे आहे. यंदा मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा पाच टक्के अधिक पाऊस झाला. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनच्या माघारीची सर्वसाधारण तारीख १७ सप्टेंबर आहे, मात्र, यावेळी ती २३ सप्टेंबर आहे. येत्या २४ तासांत पश्चिम राजस्थानआणि लगतच्या पंजाब, हरयाणा आणि गुजरातच्या काही भागातून नैर्ऋत्य मोसमी वाऱ्याच्या माघारीसाठी अनुकूल परिस्थिती आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. त्यामुळे यंदाचा मान्सून १०५ ते ११० टक्के या श्रेणीत असून, जूनमध्ये ११ टक्के पावसाची कमतरता असतानाही अशी स्थिती आहे. यावर्षी मान्सूनचे आगमन १ ते ५ जून या सर्वसाधारण तारखेच्या तुलनेत ३० मे रोजी झाले. २ जुलैपर्यंत त्याने संपूर्ण देश व्यापला होता. सलग तिसऱ्या वर्षी २ जुलैपर्यंत संपूर्ण देश मान्सूनने व्यापला होता.

जम्मू-काश्मीरमध्ये उणे २६ टक्के, हिमाचल प्रदेशात उणे २० टक्के, अरुणाचल प्रदेशात उणे ३० टक्के, बिहारमध्ये उणे २८ टक्के आणि पंजाबमध्ये उणे २७ टक्के पाऊस झाला. त्याचवेळी नऊ उपविभाग असे होते जिथे पावसाचा आकडा खूप जास्त होता. यामध्ये राजस्थान (७४ टक्के), गुजरात (६८ टक्के), महाराष्ट्र, तामिळनाडू आणि किनारी आंध्र प्रदेश यांचा समावेश आहे.

पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात मंगळवारी कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने पूर्व किनारपट्टीलगतच्या काही राज्यांमध्ये पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## अमित शाह यांचा घणाघात

# काँग्रेस दलितविरोधी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस हा दलितविरोधी पक्ष असून कुमारी शैलजा आणि अशोक तंवर यांच्यासारख्या नेत्यांचा अपमान केल्याचा आरोप केला आहे. आरक्षणाबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावर ही टीका करताना ते म्हणाले की, केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच आरक्षणाचे समर्थन करणारे आहेत.



टोहाना येथील एका प्रचार सभेत अमित शहा म्हणाले, काँग्रेस हा अनुसूचित जातीविरोधी पक्ष आहे. अशोक तंवर असो वा कुमारी शैलजा, पक्षाने नेहमीच अनुसूचित जातीच्या नेत्यांचा अपमान केला. काँग्रेसने सर्वांचा अपमान केला आहे. आरक्षणाबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावर ते म्हणाले, विकासानंतर आरक्षणाची गरज नाही, असे राहुल गांधी यांनी अमेरिकेत सांगितले. काँग्रेसने आरक्षण मागे घेणार असल्याचेच यातून स्पष्ट केले आहे. हरियाणा हे पूर्णविकसित राज्य आहे. तुम्हाला आरक्षण हवे आहे की नाही, असा सवाल त्यांनी उपस्थितांना केला. एससी आणि ओबीसी आरक्षणाचे रक्षण करण्यासाठी पंतप्रधान मोदी हवे आहेत, असेही ते म्हणाले.

भूपेंद्रसिंह हुड्डा आणि राहुल गांधी यांना मी २००५ च्या गोहाना घटनेची आठवण करून देऊ इच्छितो. याला काँग्रेस जबाबदार होती. गोहाना येथे अनुसूचित जातीच्या एका अनुसूचित जातीचा खुनात सहभाग असल्याचा संशय आल्याने अनुसूचित जातींची काही घरे जाळण्यात आली.

## सीजिंग राजा चकमकीत ठार

**चेन्नई :** चेन्नईच्या ईस्ट कोस्ट रोडवर पोलिस चकमकीत ३० हून अधिक गुन्हेगारी प्रकरणांत सामील असलेला हिस्ट्रीशीटर 'सीजिंग' राजा ठार झाला. पोलिसांनी सांगितले की, आदल्या दिवशी आंध्र प्रदेशातील या कुख्यात राजाने अधिकाऱ्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा स्वसंरक्षणार्थ त्याची हत्या करण्यात आली. बराच काळ हा गुन्हेगार पोलिसांच्या रडारवर होता. त्याच्यावर तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात खून, खुनाचा प्रयत्न आणि खंडणीचे गुन्हे दाखल आहेत. बसपचे तामिळनाडू अध्यक्ष के. आर्मस्ट्राँग यांच्या हत्येसंदर्भातही पोलिसांनी त्यांची चौकशी केली.

## पूर ओसरल्यानंतर

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**स्ट्रॉनी स्लास्की :** पोलंडमधील स्ट्रॉनी स्लास्की येथे मोरावका नदीला आलेल्या पूरानंतर, तेथील जनजीवन प्रभावित झाले होते. पाणी ओसरल्यानंतर नुकसानीचा अंदाज येतो.

# केजरीवालांच्या खुर्चीवर विरोधकांची टीका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री आतिशी यांनी पदभार स्वीकारला असून, त्यांनी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची खुर्ची रिकामी ठेवली आहे. आतिशी यांनी त्याशेजारी आपली खुर्ची ठेवणार असल्याचे जाहीर केले. मात्र, भाजप आणि काँग्रेसने हा राज्यघटनेचा अवमान असल्याचे सांगत त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

आतिशी यांनी केजरीवाल यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर न बसता ती रिकामी ठेवण्याचा निर्णय दिल्यानंतर एक सर्वेक्षण करण्यात आले. यात, आतिशी यांनी 'मुख्यमंत्र्यांची खुर्ची' रिकामी ठेवणे योग्य आहे का? असे विचारण्यात आले. ४ हजारांहून अधिकांनी यात सहभाग घेतला. सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार ७४ टक्के लोकांनी आतिशी यांचा निर्णय बरोबर नसल्याचे म्हटले. २६ टक्के लोकांनी त्यांच्या या निर्णयाचे समर्थन केले आहे.

आतिशी म्हणाल्या की, त्यांनी व्यथित अंतःकरणाने मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. प्रभू राम वनवासात गेल्यानंतर ज्याप्रमाणे भरतने १४ वर्षे अयोध्येचा कारभार सांभाळला, त्याचप्रमाणे पुढील चार महिने दिल्लीवरही राज्य करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

मुख्यमंत्री झाल्यानंतरही मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर न बसल्याबद्दल भाजप आणि काँग्रेसने आतिशी यांच्यावर टीका केली आहे. दोन्ही पक्षांनी ही राज्यघटनेची खिल्ली उडवणारी घटना असल्याचे म्हटले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष देवेंद्र यादव यांनी केजरीवाल यांची तुलना प्रभू रामाशी करणे हे मोठे पाप असल्याचे म्हटले आहे.

# काँग्रेसला मोठा धक्का

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणात ५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे माजी आमदार जय तीरथ दहिया यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. राजीनामा देण्याबरोबरच त्यांनी पक्षावर अनेक आरोपही केले आहेत. जय तीरथ यांनी पक्षावर पैशांसाठी तिकिटे विकल्याचा आरोप केला आहे. २००९ आणि २०१४ मध्ये आमदार राहिलेल्या दहिया यांना आगामी निवडणुकीत तिकीट नाकारण्यात आले होते. त्यांच्या जागी पक्षाने जयभगवान अंतिल यांना उमेदवारी दिली आहे.

जय तीरथ म्हणाले, प्रबळ दावेदार असूनही पक्षाने मला तिकीट नाकारून माझा अवमान केला आहे. त्यामुळेच मी पक्ष नेतृत्वाकडे राजीनामा सुपूर्द केला आहे. उमेदवारी देताना घोटाळा झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## कट्टरपंथी संघटनेविरोधात चेन्नईत छापेमारी

# एनआयएची मोठी मोहीम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतात इस्लामी राजवटीचा कट रचणाऱ्या हिज्बुल-उत-तहरीर या कट्टरपंथी संघटनेविरोधात एनआयएने मोठी मोहीम हाती घेतली आहे. एनआयएने तामिळनाडूत किमान ११ ठिकाणी छापे टाकले आहेत. जगभरातील अनेक देशांमध्ये या संघटनेवर बंदी आहे. चेन्नई सेंट्रल क्राइम ब्रँचने तरुणांचे ब्रेनवॉश करून त्यांना देशविरोधी कारवायांमध्ये गुंतविल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. आता हे प्रकरण एनआयएकडे सोपवण्यात आले आहे.

चेन्नई सेंट्रल क्राइम ब्रँचने दिलेल्या माहितीनुसार, रोयापेट्टा येथील पिता-पुत्र आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हिज्बुल-उत-तहरीरमध्ये सामील होण्यासाठी लोकांचे ब्रेनवॉश केले. दहशतवादाशी संबंधित हे प्रकरण गुन्हे शाखेने एनआयएकडे सोपवले आहे. अशाच एका प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेल्या काही आरोपींचीही चौकशी केली जात आहे. चौकशीदरम्यान काही माहिती मिळाल्यानंतर एनआयएने पुडुकोट्टई, कन्याकुमारी आणि तांबरमसह ११ ठिकाणी कारवाई सुरू केली. प्रक्षोभक भाषणे करून तरुणांना फसवण्याचा प्रयत्न हिज्ब-उत-तहरीर करतो. तरुणांना जिहादसाठी तयार करण्याबरोबरच त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षणही दिले जाते. कट्टरपंथी दहशतवादी संघटनाही जैविक शस्त्रे बनविण्याचे प्रशिक्षण देतात. हिज्बुल-उत-ताहीर हा देखील धर्मांतरात सहभागी आहे. याशिवाय लव्ह जिहादच्या घटनांमध्येही त्याचा हात सापडला आहे.

इस्लामी राष्ट्र निर्माण करणे हे या कट्टरपंथी संघटनेचे उद्दिष्ट आहे. जेरुसलेममध्ये १९५२ मध्ये या संघटनेची स्थापना झाली असून, याचे मुख्यालय लंडन येथे आहे.

## इस्रायल-हमास संघर्षात लाखो पॅलेस्टिनी विस्थापित

# गाझातील पूनर्वसनाचे मोठे आव्हान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**गाझा पट्टी :** गाझाच्या इतिहासातील सर्वात घातक युद्धामुळे झालेल्या विनाशामुळे पॅलेस्टिनींचे पूनर्वसन हे एक मोठे आव्हान ठरत आहे. यापूर्वीही गाझा पट्टीतील पॅलेस्टिनींना अशा पद्धतींमुळे आपले घरदार सोडून इतरत्र स्थलांतरित व्हावे लागले आहे. मात्र, यावेळी परिस्थिती फारच गंभीर असल्याची भावना आहे.



गाझातील पॅलेस्टिनींसाठी ही नवी गोष्ट नाही. अनेक पॅलेस्टिनी नागरिक गाझा आणि शेजारच्या इजिप्तमध्ये विखुरलेले आहेत. युद्ध थांबले तरच ते पुन्हा आपल्या जागेवर घर बांधू शकणार आहेत. अन्यथा त्यांना इतरत्र आश्रय घ्यावा लागणार आहे.

गाझा पट्टीवर अजूनही बॉम्बचा वर्षाव होत असताना, पॅलेस्टिनी प्रदेशातील २४ लाख पॅलेस्टिनी विस्थापित झाले आहेत. पुनर्बांधणीसाठी आवश्यक संसाधने कशी मिळवायची याचे त्यांच्यासमोर मोठे आव्हान असेल. ७ ऑक्टोबरला इस्रायल-हमास संघर्षाला तोंड फुटून एक वर्ष पूर्ण होत असताना, मानवाधिकार संघटनांसमोर गाझा पट्टीतील पूनर्वसन करण्यासाठी योजना आखावी लागत आहे. तसेच मुलांच्या शिक्षणासाठीही प्रयत्न करावे लागणार आहेत. तथापि, शस्त्रसंधीचा पर्याय प्रत्यक्षात आलेला नसल्याने, त्यावर आताच काही विचार करण्यात अर्थ नाही, अशीही भावना आहे.


एका अहवालानुसार, उद्ध्वस्त झालेल्या सुमारे ७९,००० घरांची पुनर्बांधणी करण्यासाठी ८० वर्षे लागू शकतात, असे मे महिन्यात नमूद करण्यात आले होते. जुलैमध्ये एका अहवालात म्हटले होते की, कामगारांना केवळ ढिगारा साफ करण्यासाठी १५ वर्षे लागू शकतात. गाझा पट्टीत औषधोपचार, अन्न, निवारा आणि शिक्षण या प्राथमिक समस्या आहेत. त्यांच्या सोडवणुकीसाठी प्राधान्याने काम करावे लागणार आहे.

२००७ मध्ये हमासने गाझाचा ताबा घेतल्यानंतर इस्रायलने गाझावर घातलेली नाकेबंदी अजूनही कायम असून, बांधकाम साहित्याच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले आहेत.



## विनेशने देशाची माफी मागावी, देशाला सत्य कळले पाहिजे

**लंडन ऑलिम्पिकचा कांस्यपदक विजेता योगेश्वर दत्त म्हणाला, विनेश फोगटला ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरवण्यात आले होते, जर एखादा खेळाडू अपात्र ठरला असेल तर त्याने संपूर्ण देशासमोर माफी मागितली पाहिजे की माझ्याकडून चूक झाली, मी पदक गमावले, पण त्याला एक असे स्वरूप देण्यात आले की पीएम मोदींवर आरोप झाले. भारताची चुकीची प्रतिमा निर्माण झाली. विनेश फोगाटने काँग्रेसच्या तिकिटावर हरियाणाची निवडणूक लढवल्याच्या मुद्द्यावर योगेश्वर यांनी सांगितले की, राजकारणात जाणे हा वैयक्तिक निर्णय आहे, पण देशाला सत्य कळले पाहिजे.**



### शाब्बास पोरींनो! पुण्याच्या लेकीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची

## चीनवर मात ! ऐतिहासिक पदक जिंकले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**इटली :** भारतीय महिला रोलर डर्बी संघाने इटली येथे झालेल्या जागतिक स्केट क्रीडा स्पर्धेत ब्राँझपदक जिंकून इतिहास रचला. कर्णधार श्रुतिका सरोदेच्या नेतृत्वात टीम इंडियाने चीनवर १२७-३९ अशी थरारक धावसंख्या नोंदवत हा टप्पा गाठला. वर्ल्ड स्केट गेम्समध्ये रोलर डर्बीमध्ये दोन्ही संघांची ही दुसरी वेळ होती. प्राथमिक सामन्यांपासून ते अंतिम ब्राँझपदकाच्या लढतीपर्यंत या संघांनी थरारक खेळ सादर केला आणि प्रेक्षकांना आपल्या जागेच्या काठावर खिळवून ठेवले. कांस्यपदकाच्या चुरशीच्या लढतीत चीनवर विजय मिळवला. या स्पर्धेतील भारताचे हे पहिलेच पदक ठरले.

जागतिक स्केट स्पर्धेत भारत व चीन दोन्ही संघांनी दुसऱ्यांदाच सहभाग घेतला होता आणि दोन्ही देशांच्या खेळाडूंनी कामगिरीत प्रचंड सुधारणा केली. पण, कांस्यपदकासाठी झालेल्या सामन्यात भारताने १२७-३९ अशी बाजी मारली.

भारतीय खेळाडूंनी चीनच्या प्रत्येक बचावात्मक चुकांचा फायदा घेतला आणि विजेच्या वेगाने पासेस देऊन गुण मिळवले. चीनचा बचाव भारताच्या धडाकेबाज वेग आणि चपळाईने भारावून गेला होता, तर त्यांचे जॅमर भारताच्या खडक-घन फॉर्मेशनमध्ये प्रवेश करण्यासाठी धडपडत होते.

महिला संघाला कांस्यपदक जिंकता आले असले तरी पुरुष संघाला चीनकडून पदकाच्या लढतीत ७५-११९ असा पराभव पत्करावा लागला. अमेरिकेने पुरुष आणि महिला अशा दोन्ही प्रकारात सुवर्णपदक जिंकले. वर्ल्ड स्केट गेम्स ही एक आंतरराष्ट्रीय द्विवार्षिक स्पर्धा आहे, ज्यामध्ये जागतिक स्केट इंटरनॅशनल फेडरेशनद्वारे नियमन केलेल्या सर्व जागतिक रोलर स्पोर्ट्सचा समावेश आहे.

## कॅरम स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे चारही संघ सज्ज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल भारतीय कॅरम महासंघाच्या वतीने मध्यप्रदेश येथे ज्युनियर राष्ट्रीय अजिंक्यपद कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे चारही संघ सज्ज झाले आहेत.

या स्पर्धेमध्ये १८ वर्षांखालील मुले, २१ वर्षांखालील मुले, १८ वर्षांखालील मुली, २१ वर्षांखालील मुली या चार गटांमध्ये कॅरमपटूंना आपली चमक दाखवावी लागणार आहे.

या स्पर्धेसाठी आठ मुले, आठ मुली व संघ व्यवस्थापक असा एकंदर १८ जणांचा महाराष्ट्राचा संघ ग्वालियर येथे रवाना झाला. सांघिक व वैयक्तिक अशा दोन विभागांमध्ये या संघातील खेळाडू सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र कॅरम संघटनेच्या वतीने संघाला प्रत्येकी दोन टी शर्ट, दोन ट्राऊजर्स, वातानुकूलित रेल्वे प्रवास सवलत तसेच प्रत्येकी रुपये १,००० रुपये खर्चासाठी देण्यात आले आहेत. स्पर्धेला रवाना होण्यापूर्वी संघाचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर मुंबईत घेण्यात आले होते. या स्पर्धेचा शेवट २६ सप्टेंबरला होणार आहे.

### तिसरी राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धा



## शौरेन सोमणही अंतिम फेरीत

### पुण्याची नैशा रेवसकर दोन गटात अंतिम फेरीत

**पुणे :** पुण्याची राष्ट्रीय खेळाडू नैशा रेवसकर हिने विजयी वाटचाल कायम ठेवीत तिसऱ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील अनुक्रमे १५ व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात अंतिम फेरी गाठली मुलांच्या सतरा वर्षाखालील गटात शौरेन सोमण यानेही विजेतेपद मिळवण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे.

टेबल टेनिस स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ संभाजीनगर यांनी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात संभाजीनगर जिल्हा टेबल टेनिस संघटना आणि महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रेवसकर हिने पंधरा वर्षाखालील गटाच्या उपांत्य फेरीत ठाण्याची चौथी मानांकित खेळाडू अन्वी थोरात हिच्यावर ११-९, ११-३,१२-१० अशा सरळ तीन गेम्स मध्ये मात केली. उपांत्य फेरीच्या अन्य लढतीत द्वितीय मानांकित स्वरा करमरकर (नाशिक) हिने तृतीय मानांकित सन्वी

पुराणिक (ठाणे) हिला पराभूत केले. तिने हा सामना चिवट लढतीनंतर ११-४, १५-१७,११-८,९-११,११-७ असा जिंकला. १७ वर्षाखालील गटाच्या उपांत्य लढतीत रेवसकर हिने ठाण्याची खेळाडू स्वराज जगदाळे हिचे आव्हान ७-११,११-९,११-४, ११-२ असे संपुष्टात आणले. अन्य लढतीत रितिका माथुर या ठाण्याच्या खेळाडूने आपली सहकारी अन्वी थोरात हिचा पराभव केला पाचव्या मानांकित माथूर हिला हा सामना ९-११,११-६,११-९, १०-१२,११-७ असा जिंकताना संघर्ष करावा लागला. मुलांच्या सतरा वर्षाखालील गटात चौदाव्या मानांकित सोमण याने अनपेक्षित विजयाची मालिका कायम ठेवताना मयुरेश सावंत या ठाण्याच्या खेळाडूला १२-१०, ५-११,११-९,११-९ असे हरविले. अन्य उपांत्य फेरीत पाचवा मानांकित खेळाडू पार्थ मगर (मुंबई महानगर जिल्हा) याने अग्रमानांकित खेळाडू ध्रुव शाह (टी एस टी मुंबई) याला पराभूत करीत आश्चर्यजनक विजय नोंदविला.

### ३८ वी महाराष्ट्र राज्य कुमार मैदानी अजिंक्यपद स्पर्धांमध्ये

## सर्वसाधारण विजेतेपद पुणे जिल्ह्याला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ३८व्या महाराष्ट्र राज्य कुमार मैदानी अजिंक्य पद स्पर्धा २०२४ स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पुणे संघाने ४१३ गुण मिळवत मिळवले. उप - विजेतपद ठाणे संघाने २६४ गुण मिळवत प्राप्त केले.

ही स्पर्धा १४, १६ ,१८ व २० वर्षा खालील मुले आणि मुली या एकूण आठ गटात ज्या जिल्ह्यांनी गुणांकन तक्त्यात प्रथम आणि द्वितीय स्थान घेतले त्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. समारंभाचे प्रमुख पाहुणे पुणे जिल्हा हौशी अॅथलेटिक्स संघटनेचे उपाध्यक्ष आणि पुण्याचे राष्ट्रीय धावपटू , माजी नगरसेवक अविनाश बागवे होते. यावेळी महाराष्ट्र अॅथलेटिक्स संघटनेचे सचिव सतीश ऊचील( मुंबई), उपाध्यक्ष सांगलीचे संजय पाटील, धाराशिव चे सचिव योगेश थोरबोले , संयोजन सचिव राजीव कुलकर्णी ,पुणे आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू गुर्बंस कौर उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र संघटने तर्फे भारतीय संघात निवड झालेल्या (आणि त्यातील पदक मिळवलेल्या ) खालील खेळाडूंचा सत्कार अविनाश बागवे,सतीश ऊचील, गुरबंस कौर व राजीव कुलकर्णी यांचे हस्तेकरण्यात आला. प्रस्ताविक चंद्रकांत पाटील तर आभार राजीव कुलकर्णी यांनी मानले.

१. ऋतुजा भोसले ( पुणे)- सुवर्ण पदक -ज्युनिअर अशियाई मैदानी स्पर्धा , दुबई , २०२४ - ४००x१०० रीले स्पर्धा ( मुली)

२. गौरव भोसले -(पुणे) - सहभाग - ज्युनिअर आशियाई मैदानी स्पर्धा दुबई, २०२४ ( धावणे - ३००० मीटर आणि ५००० मीटर)

**गट अजिंक्यपद प्राप्त जिल्हे - गुणांकन तक्ता**

- १४ वर्षा खालील मुले. ठाणेसंघ............. **१५ गुण**
- १४ वर्षा खालील मुली. पुणेसंघ............. **३१ गुण**
- १६ वर्षा खालील मुले. कोल्हापूर संघ.... **३० गुण**
- १६ वर्षा खालील मुली. ठाणे संघ............ **३६ गुण**
- १८ वर्षा खालील मुले. पुणे संघ ............ **४९ गुण**
- १८ वर्षा खालील मुली. पुणे संघ............ **५१ गुण**
- २० वर्षा खालील मुले. पुणे संघ .......... **१०३ गुण**
- २० वर्षा खालील मुली. पुण संघ.......... **१११ गुण**



## भारत-बांगलादेश टेस्ट मॅचच्या सुरक्षेसाठी मास्टर प्लॅन



**मुंबई :** कानपूरमध्ये गेल्या 40 दिवसांत तीन वेळा ट्रेन उडवण्याचा कट आणि ग्रीनपार्क स्टेडियमवर भारत-बांगलादेश यांच्यातील पाच दिवसीय कसोटी सामन्याबाबत पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत. कसोटी सामन्यात सुमारे 1.25 लाख प्रेक्षकांची ये-जा असेल. ग्रीन पार्क आणि हॉटेल लँडमार्कसाठी त्रिस्तरीय सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला आहे. दोन्ही ठिकाणी पोलीस, पीएसी आणि आरएएफकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यासोबतच ड्रोन मॉनिटरिंग आणि स्टेडियमच्या सर्वांगीण छतावरील सुरक्षेसाठी ब्लू प्रिंट तयार करण्यात आली आहे. ग्रीनपार्क स्टेडियमवर पाच दिवसांचा कसोटी सामना सुरू असून खेळाडू हॉटेल लँडमार्कमध्ये थांबले आहेत. 25 हजार प्रेक्षक क्षमतेच्या स्टेडियममध्ये पाच दिवसांत सुमारे 1.25 लाख प्रेक्षक पोहोचतील.

## योगेश इलेव्हन, हेमंत किणीकर अॅकॅडमी, क्रिकेट नेक्स्ट संघांची विजयी कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत योगेश इलेव्हन, हेमंत किणीकर क्रिकेट अॅकॅडमी आणि क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अक्षया जाधव हिने फटकावलेल्या शतकी खेळीमुळे योगेश इलेव्हनने मिलेनियम नॅशनल स्कूलचा १६३ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या योगेश इलेव्हनने २२० धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये अक्षया जाधव हिने ९२ चेंडूत ११ चौकारांसह १०१ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना मिलेनियम नॅशनल स्कूलचा डाव ५७ धावांवर संपुष्टात आला.

इधांत पांडकर याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे हेमंत किणीकर क्रिकेट अॅकॅडमीने २एन क्रिकेट अॅकॅडमीचा ६ गडी राखून पराभव केला. हेमंत अॅकॅडमीकडून इधांत याने १८ धावात ३ गडी बाद केले. आणखी एका सामन्यामध्ये युग सोनिग्रा याने केलेल्या फलंदाजीच्या जोरावर क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीने एके स्पोर्टस अॅकॅडमीचा ७ गडी राखून सहज पराभव केला.

### पीडीएफथर्ड डिव्हिजन फुटबॉल स्पर्धा

## दुर्गा एससी व ईगल्स एफसीमध्ये फायनल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीडीएफए थर्ड डिव्हिजन 2024च्या अंतिम फेरीत दुर्गा स्पोर्ट्स क्लब व ईगल्स फुटबॉल क्लब आमनेसामने आहेत. गोयल गंगा मैदानावर फ्लड लाईट्सखाली खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीत दोन्ही क्लबनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. दुर्गा एससीने सिटी एफएवर 3-0 असा सहज विजय नोंदवला. त्यात करण दुर्गा (13') आणि नीरज मानेने (14') यांनी मध्यंतराला टीमला 2-0 अशी आघाडी मिळवून दिली. उत्तरार्धात, मयूर वाघिरेने(60+4') त्यात आणखी भर घातली. अंतिम फेरीत दुर्गा एमससीचा सामना ईगल्स एफसीशी होईल. त्यांनी उपांत्य फेरीत सांगवी एफसी 'ब' टीमचा 1-0 असा पराभव केला.

### ४५ व्या फिडे चेस ऑलिंपियाड २०२४च्या भारतीय महिला संघाकडून

## अभिजीत कुंटे यांचे जल्लोषात स्वागत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू व पंचांच्या उपस्थितीत भारतीय महिला बुद्धिबळ संघाचे प्रशिक्षक व मेजर ध्यानचंद पुरस्कार विजेते ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय खेळाडू ग्रँड मास्टर अभिजीत कुंटे यांचे येथील विमानतळावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय महिला संघाने बुडापेस्ट, हंगेरी येथे नुकत्याच झालेल्या 45व्या फिडे चेस ऑलिंपियाड स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले होते.

लोहगाव विमानतळावर मंगळवारी सकाळी कुंटे यांचे आगमन झाले. त्यावेळी त्यांचे वडील तसेच ज्येष्ठ बुद्धिबळ संघटक प्रकाश कुंटे, त्यांची बहीण आंतरराष्ट्रीय महिला मास्टर मृणालिनी कुंटे औरंगाबादकर, पुणे डिस्ट्रिक्ट चेस सर्कलचे सहसचिव शेखर जोरी आंतरराष्ट्रीय पंच राजेंद्र शिदोरे, नितीन शेणवी, अथर्व गोडबोले, विनिता श्रोत्री, फिडे पंच अमरीश टिल्लू , मितला शेणवी, अमित केंच, संकेत यादव, गणेश अंताड, विभा लिमये, अभिजीत यांचे बालपणापासूनचे मित्र अमोल पवार तसेच कुंटे परिवारातील अनेक जण उपस्थित होते.

कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय महिला संघाने गतवेळी चेन्नई येथे झालेल्या बुद्धिबळ ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

**सत्काराने भारावून गेलो-कुंटे**

घरच्यांबरोबरच अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू व पंचांच्या उपस्थितीत माझे जे भव्य स्वागत करण्यात आले त्यामुळे मी खूप भारावून गेलो आहे असे सांगून अभिजीत कुंटे म्हणाले," भारतीय पुरुष व महिला संघांनी ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकून जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात भारताचे वर्चस्व सिद्ध केले आहे. या यशामध्ये दोन्ही संघांमधील खेळाडू आणि त्यांना मदत करणारे अनेक जण तसेच अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाचे सर्व पदाधिकारी यांचा मोठा वाटा आहे. यापुढेही भारतीय खेळाडू अशीच सातत्यपूर्ण कामगिरी करत राहतील अशी मला खात्री आहे."

SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY'S
SINHGAD COLLEGE OF NURSING
Narhe (Ambegaon Bk.), Off Westerly Bypass Road, Pune - 411 041
Phone : 020 - 67537142 / 43 Web: www.sinhgad.edu
(Approved by Indian Nursing Council and Maharashtra Nursing Council & Affiliated to MUHS, Nashik, Maharashtra)
Sinhgad Institutes

**Accredited by NAAC with 'A' Grade**

**NURSING : ADMISSIONS OPEN : 2024-25**

Applications are invited from eligible candidates for admissions to First Year of B. Sc. Nursing, Post Basic B. Sc. Nursing & M. Sc. Nursing under **vacant seats / institutional quota (including NRI 15%)** as per given details below for the A. Y. 2024-25.

| | |
|---|---|
| B. Sc. Nursing | Bachelor of Science in Nursing<br>Full Time : 4 Years |
| Post Basic B. Sc. Nursing | Post Basic Bachelor of Science in Nursing<br>Full Time : 2 Years |
| M. Sc. Nursing | Master of Science in Nursing<br>Full Time : 2 Years |

**Eligibility**: **1) B.Sc. Nursing:** Passed Std. 12th Science (PCB) with minimum 45% marks for open category (40% marks for reserved category) and MH-B.Sc. Nursing-CET-2024 mandatory with minimum 50 percentile marks for open category (40 percentile marks for reserved quota).

| Category | SC | ST | DT-A | NT-B | NT-C | NT-D | OBC & SBC | SEBC | EWS | Open | NRI / OCI / OMS | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Percent | 6.5% | 3.5% | 1.5% | 1.25% | 1.75% | 1% | 9.5% | 10% | 10% | 40% | 15% | 100% |
| Available Seats | – | – | – | – | – | – | – | – | – | – | 07 | 07 |

**2) Post Basic B.Sc. Nursing:** Passed RGNM Diploma and registration under State Nursing Council. The category-wise seats available are as follows:

| Category | SC | ST | DT-A | NT-B | NT-C | NT-D | OBC & SBC | SEBC | EWS | Open | NRI / OCI / OMS | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Percent | 6.5% | 3.5% | 1.5% | 1.25% | 1.75% | 1% | 9.5% | 10% | 10% | 40% | 15% | 100% |
| Available Seats | – | – | – | – | – | – | – | 05 | – | 01 | – | 06 |

**3) M.Sc. Nursing:** Passed B.Sc. Nursing / Post Basic B.Sc. Nursing exam with at least 55% marks for open category (50% marks for reserved category, Maharashtra State only) with one year experience after registration under State Nursing Council. The category-wise seats available are as follows:

| Sr. No. | Speciality | Total Seats | SC | ST | VJ-DT-A | NT-B | NT-C | NT-D | OBC | SEBC | EWS | OPEN | Inst. Quota (Including 15% NRI) | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 6.5% | 3.5% | 1.5% | 1.25% | 1.75% | 1% | 9.5% | 10% | 10% | 40% | 15% | 100% |
| 1 | Child Health Nursing | 5 | – | – | – | – | – | – | – | 01 | – | 01 | – | 02 |
| 2 | Community Health Nursing | 5 | – | – | – | – | – | – | – | 01 | – | – | 01 | 02 |
| 3 | Obstetrics & Gynecological Nursing | 5 | – | – | – | – | – | – | – | 01 | – | – | – | 01 |
| | Total | – | – | – | – | – | – | – | – | 03 | – | 01 | 01 | 05 |

**Admission Procedure**: The Admission Form & Prospectus will be available at the college office on payment of Rs. 1050/-. The duly filled in Admission Form along with testimonials should be submitted in the college office during working hours. The candidate should directly approach to the **Principal, Dr. (Mrs.) Jyoti Naikare [09921860315 / 09766021602]**. The candidates are advised to refer admission schedule on college website: **www.sinhgad.edu**

**Unique Features**: • 1000+ Beds and 25 Operation Theaters' General Hospital with ultra modern medical equipments and facilities • Lush green campus • Student friendly environment • Well stocked Library • e-Library & Multimedia • Round the clock internet and Wi-Fi connectivity • Separate hostel for boys and girls with mess • Play Fields and Gymnasium • On the campus Medical and Banking Facility • Shopping Complex • Students Amenities provided in the Campus.

**Note**: The Institute has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted by all institutes under Sinhgad Technical Education Society. Candidates are advised to be in touch with the College Principal / Authorised College Staff only.

*Subject to Pune Jurisdiction only

**www.sinhgad.edu**

**Prof. M. N. Navale**
Founder President